

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, २६ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३४६ | किंमत : २ रूपये

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

पुणे न्यायालयाबाहेर खुनी संघर्ष

कोयता हल्ला व गोळीबार प्रकरणात ५ आरोपींना अटक

वृत्तसंस्था, पुणे

शिवाजीनगर न्यायालयाच्या गेट नंबर ४ बाहेर भरदुपारी झालेल्या गोळीबार आणि कोयता हल्ल्याच्या घटनेनंतर पुणे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या काही तासांत ५ आरोपींना ताब्यात घेतले आहे. या संपूर्ण हल्ल्याचा कट रचणाऱ्या अक्षय चव्हाण आणि अमोल चव्हाण या दोघांना पुण्यातून अटक करण्यात आली असून, थेट हल्ल्यात सहभागी असलेल्या आणखी ३ आरोपींना पुणे गुन्हे शाखेने दौंडमधून बेड्या ठोकल्या आहेत.

ज्यांनी या रक्तरंजित हल्ल्याचा संपूर्ण कट रचला होता, त्या अक्षय चव्हाण आणि अमोल चव्हाण यांना पुणे क्राईम ब्रँचने





पुण्यातून ताब्यात घेतले आहे. तर दुसरीकडे, पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या ३ प्रत्यक्ष हल्लेखोरांना पुणे क्राईम ब्रँचने दौंड परिसरात सापळा रचून अटक केली आहे.

शिवाजीनगर कोर्ट परिसरात फायरिंग आणि कोयत्याने वार केल्यानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला होता. हे आरोपी आधी दौंडच्या दिशेने आणि त्यानंतर सोलापूरच्या दिशेने निघाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पुणे पोलिसांनी तत्काळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून तांत्रिक तपास सुरू केला.

आरोपी ज्या मार्गाने पुढे गेले, त्या मार्गावरील सर्व पोलीस ठाण्यांना सतर्कतेचा इशारा देत माहिती पोहोचवण्यात आली. तसेच त्या मार्गावरील सर्व चेक पॉईंट्सवर पुणे पोलिसांची क्राईम ब्रँच तैनात करण्यात आली होती.

नाकाबंदी आणि क्राईम ब्रँचच्या पथकाने केलेल्या कारवाईत ३ हल्लेखोर दौंडमधून ताब्यात घेण्यात आले असून, आता त्यांना पुढील सखोल चौकशीसाठी पुण्यात आणले जात आहे.बुधवारी दुपारी सव्वाच्या सुमारास शिवाजीनगर न्यायालयाच्या गेट नंबर ४ जवळ हा थरार घडला. कात्रज भागातील रहिवासी असलेला मंदार किवळे हा कोर्टातील सुनावणी आटोपून गेट नंबर ४ बाहेर आला असता, दोन दुचाकीवरून आलेल्या ६ हल्लेखोरांनी त्याला घेरले. हल्लेखोरांनी आधी त्याच्यावर पिस्तुलातून गोळीबार करण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर हातातील कोयत्यांनी त्याच्यावर सपासप जीवघेणे वार केले.

भर गर्दीत झालेल्या या हल्ल्यामुळे न्यायालय परिसरात मोठा गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले. या हल्ल्यात मंदार किवळे गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या हल्ल्यामागे गुन्हेगारीची जुनी पार्श्वभूमी आणि वैमनस्य असल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. जखमी मंदार किवळे हा २०२५ मध्ये झालेल्या शुभम चव्हाण हत्या प्रकरणातील आरोपी असून, नुकताच तो जामिनावर बाहेर आला होता. आज या प्रकरणाच्या सुनावणीसाठी तो कोर्टात आला असता, शुभमच्या हत्येचा बदला घेण्यासाठी हा हल्ला झाल्याचा पोलिसांचा अंदाज आहे.

दरम्यान, फरार आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी पुणे पोलिसांची ८ ते १० विशेष पथके तैनात करण्यात आली होती, ज्यांना मोठी कामगिरी बजावण्यात यश आले आहे. मात्र, न्यायालयासारख्या अतिसंवेदनशील परिसरात शस्त्रे घेऊन येण्याची हिंमत हल्लेखोरांमध्ये निर्माण होतेच कशी? असा सवाल आता पुणेकर उपस्थित करत आहेत.

थोडक्यात

सेन्सेक्स २००० अंकांनी वाढला

नवी दिल्ली : भारतीय शेअर बाजारात एक नेत्रदीपक तेजी दिसून आली आहे. दुपारपर्यंत सेन्सेक्स २,००० हून अधिक अंकांनी, म्हणजेच सुमारे २.४५ टक्क्यांनी वाढून ८४,४४२.०९ अंकांवर पोहोचला. निफ्टी ५८०.९५ अंकांनी, म्हणजेच २.२९ टक्क्यांनी वाढून २५,९२८. ८५ अंकांवर व्यवहार करत होता. बँक निफ्टीमध्येही १,५०० हून अधिक अंकांची उसळी दिसून आली. मागील सत्रातील मोठ्या घसरणीनंतर बुधवारी शेअर बाजारात ही तेजी आली आहे. मात्र, या प्रचंड वाढीमुळे गुंतवणूकदारांना अंदाजे ५ लाख कोटी रुपयांचा नफा झाला आहे आणि बीएसईचे बाजार भांडवल ५१३ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेले आहे.

बीएसईच्या शीर्ष ३० शेअर्सपैकी २७ शेअर्सनी या प्रभावी तेजीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले, तर तीन शेअर्समध्ये घसरण झाली आहे. बजाज फिनसर्व्हच्या शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ झाली, ज्यात जवळपास ५ टक्के वाढ नोंदवली गेली. याव्यतिरिक्त, एचडीएफसी बँक, टाटा ट्रेंट आणि आयसीआयसीआय बँक यांसारख्या मोठ्या कंपन्यांच्या शेअर्समध्येही वाढ दिसून आली. कच्चा तेलाच्या कमी झालेल्या किमतींमुळे देशांतर्गत शेअर बाजाराला आधार मिळाला. जागतिक तेल बेंचमार्क ब्रेंट क्रूड १.४२ टक्क्याने घसरून प्रति बॅरल ९०.१२ अमेरिकन डॉलरवर व्यवहार करत होता. नोव्हेंबरमध्ये आतापर्यंत जागतिक तेल बेंचमार्कमध्ये जवळपास २३ टक्क्यांची घसरण झाली आहे. परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारां कडून सुरू असलेली खरेदी हा बाजाराला आधार देणारा आणखी एक महत्त्वाचा घटक ठरला आहे. मागील ट्रेडिंग सत्रात ५,६७२.९९ कोटींच्या इक्विटीची खरेदी केली, ज्यामुळे परदेशी निधीच्या प्रवाहातील सकारात्मक ट्रेंडला आणखी चालना मिळाली. बँकिंग स्टॉक्सनी या तेजीचे नेतृत्व केले.

राज्यात पूल तिथे बंधारा बंधनकारक

गरजेनुसार चारा छावण्या सुरू करण्यास मंजुरी, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत निर्णय, रस्ते कामांसाठी तलावांतील गाळ वापरण्याबाबत नागपूर अधिवेशनात केंद्र व राज्य सरकारमध्ये होणार करार, शेतकऱ्यांना मोफत गाळ देण्याच्या योजनेला ३० जूनपर्यंत मुदतवाढ, फार्मर आयडी आणि थेट मदतीचाही मार्ग मोकळा

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी यापुढे राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून बांधण्यात येणाऱ्या प्रत्येक नवीन पुलासोबत 'पूल वजा बंधारा' बांधणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सोलापूर आणि धाराशिवसह गरज भासेल तिथे तातडीने चारा छावण्या सुरू करण्यास मंजुरी दिल्याचे महसूलमंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

मंत्रालयात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीची आढावा बैठक झाली. जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, पशुसंवर्धन व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले, प्रत्येक पुलाखाली किमान एक मीटर पाणी अडविणार पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी शासनाने महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआरडीसी, एमएमआरडीए, सिडको, नैना आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत नदी व नाल्यांवर बांधण्यात येणाऱ्या प्रत्येक नवीन पुलाला बंधारा जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे प्रत्येक पुलाखाली किमान एक मीटर पाणी अडवले जाईल, असे स्पष्ट आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. तसेच, शक्तीपीठ महामार्गावरही पूल वजा बंधारे उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

रस्ते कामांसाठी तलावांतील गाळाबाबत करार

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून आणि बिहार सरकारच्या धर्तीवर, राज्यातील राष्ट्रीय महामार्ग आणि मुख्य रस्त्यांच्या बांधकामासाठी लागणारी माती व मुरूम जलसंपदा आणि जलसंधारण विभागाच्या तलावांमधून उपसण्यात येणार आहे. याबाबतचा सामंजस्य करार आगामी नागपूर हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत होणार आहे. यामुळे राज्यातील मोठी धरणे व तलावांचे खोलीकरण होऊन गाळ उपसण्याच्या कामाला मोठी गती मिळणार आहे.

चारा छावण्या आणि गोशाळांसाठी गायरान जमीन

राज्यातील काही भागांत निर्माण झालेली चारा टंचाई लक्षात घेता, सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार चारा छावण्या सुरू करण्यास तत्काळ परवानगी देण्यात आली आहे. चारा पुरवठ्यासाठी २०१९ मधील जुनेच दर लागू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय, गोशाळा चालविण्यासाठी पुढे येणाऱ्या संस्थांना गायरान जमिनी २ ते ३ वर्षांच्या भाडेतत्त्वावर (लीजवर) देण्याचा आणि ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार गायरान जमिनीवर २ ते ३ एकरांचे छोटे तलाव बांधण्याचा सकारात्मक विचार राज्य सरकार करत असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, आमदार रोहित पवार यांनी दुष्काळाबाबतच्या काही मागण्यांबाबत पत्र पाठविले आहे. या पत्रातील मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा करण्यात येईल. त्यासाठी लवकरच बैठक आयोजित करुन त्यातील कोणत्या मागण्या मान्य करण्यासारख्या आहेत यावर चर्चा करण्यात येईल असे सांगितले.

बैठकीतील इतर महत्त्वाचे निर्णय

गाळमुक्त धरण योजनेला मुदतवाढ : ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि मालगुजारी तलावांतील गाळ काढून शेतकऱ्यांना मोफत देण्याच्या योजनेला ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. गाळ काढण्यासाठी ३२ रुपये आणि वाहतुकीसाठी ३७ रुपये प्रति घनमीटर (कमाल अनुदान ३७,५०० रुपये) दर निश्चित करण्यात आले आहेत.

वंचित शेतकऱ्यांना मदत व फार्मर आयडी : वनपट्टे धारक आणि रेकॉर्ड नसलेल्या परंतु प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या (विशेषतः चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील) शेतकऱ्यांना ५,००० रुपयांचे अंतिम अनुदान व पुढील एनडीआरएफ/एसडीआरएफ मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, प्रलंबित 'फार्मर आयडी' काढण्यासाठी महसूल व कृषी विभागाने एसओपी जारी केली आहे.

रोहयो मजुरी आणि पाणीपुरवठा : मजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेची मजुरी ३१७ रुपयांवरून ३७५ रुपये करण्याचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

टेम्पो काळ बनून आला, तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू

वृत्तसंस्था, पुणे

पुण्याजवळील बोपदेव घाटात झालेल्या अपघातात तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. तर, दोन विद्यार्थी जखमी झाले आहेत. आज (२५ नोव्हेंबर) रोजी दुपारी अंदाजे अडीच वाजण्याच्या सुमारास कोंढवा बुद्रुक व येवलेवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील बोपदेव घाट येथे प्राणांतिक अपघात घडला. या अपघातामधील जखमी विद्यार्थ्यांवर वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरु होते. उपचारादरम्यान तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. यामध्ये एका विद्यार्थिनीचा समावेश आहे. ससून, रुबी हॉल आणि भारती हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.

बोपदेव घाटातून उताराने येणारा आयशर टेम्पो याने समोरून जात असलेल्या हुंडाई व्हेन्यू कारला पाठीमागून धडक दिली. त्यामुळे टेम्पो चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून रस्त्याच्या बाजूला असलेल्या बस थांब्यावर उभ्या असलेल्या ट्रिनिटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना टेम्पोची धडक बसली.

या अपघातात एकूण पाच विद्यार्थी जखमी झाले असून त्यांना तात्काळ उपचारासाठी विविध रुग्णालयांत दाखल करण्यात आले. त्यापैकी सिद्धेश



राजे, विशाल दांगडे व मोहिनी चौधरी या तीन विद्यार्थ्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर श्वेता तळेकर व सोहम घंगाळे हे दोन विद्यार्थी जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

सिद्धेश राजे - ससून रुग्णालय (उपचारादरम्यान मृत्यू), विशाल दांगडे - रुबी हॉल क्लिनिक, वानवडी (उपचारादरम्यान मृत्यू), मोहिनी चौधरी - भारती हॉस्पिटल (उपचारादरम्यान मृत्यू), श्वेता तळेकर - रुबी हॉल क्लिनिक, वानवडी, सोहम घंगाळे - इनामदार हॉस्पिटल, कोंढवा हे जखमी आहे. अपघातातील आयशर टेम्पो व चालक यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

बारामतीत मस्तीखोर थार चालकाने वाहतूक पोलिसाला उडवले

बारामतीमध्ये वाहतूक नियंत्रित करणाऱ्या पोलिसाला एका थार चालकानं उडवले आहे. बारामती मधील सम्यक चौक या ठिकाणी सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली. वाहतूक पोलीस वाहतूक नियंत्रित करण्यासाठी कर्तव्य बजावत होते. त्यावेळी काळ्या काचा असलेली थार आली असता ती थांबवण्याचा प्रयत्न वाहतूक पोलिसांनी केला. मात्र त्या मस्तीखोर थार चालकाने वाहतूक पोलीस कर्मचारी दत्तात्रय भोसले यांच्या थेट अंगावर गाडी घातली आणि गाडी जोरात पळवत फरार झाला. यात भोसले यांना दुखापत झाली असून सुदैवाने झालेल्या अपघातामध्ये कुठलीही जीवितहानी झाली नाही.

या मस्तीखोर थार चालकांवर गंभीर स्वरूपाची कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. या संदर्भात बारामती शहर पोलीस ठाण्यात महिंद्रा थार चालक धीरज शेडगे या चालकावर, जीवे मारण्याचा आणि कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप अशा प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मौदा नगर पंचायतीच्या प्रशासकीय इमारतीसाठी शासकीय जमीन विनामूल्य देण्यास मान्यता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाचा निर्णय

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

नागपूर जिल्ह्यातील मौदा नगर पंचायतीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी मौजा मौदा येथील ०.३८ हेक्टर नझूल शासकीय जमीन विनामूल्य उपलब्ध करून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

मौजा मौदा, (ता. मौदा, जि. नागपूर) येथील प.ह.नं. ७३, सर्व्हे क्रमांक ४५० मधील ०.३८ हेक्टर नझूल शासकीय जमीन नगर विकास विभागामार्फत मौदा नगर पंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी विनामूल्य प्रदान करण्यात येणार आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले,"स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करण्यासाठी त्यांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मौदा नगर पंचायतीच्या प्रशासकीय इमारतीसाठी शास कीय जमीन विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय हा त्या दिशेने महत्त्वाचा टप्पा आहे. या इमारतीमुळे नगर पंचायतीचे प्रशासकीय कामकाज अधिक सुव्यवस्थित होईल आणि नागरिकांना विविध सेवा-सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे सुलभ होईल. नागपूर जिल्ह्यास राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी आवश्यक सहकार्य करण्यास शासन कटिबद्ध आहे."

पुढील तीन महिने मोफत धान्य; राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

वृत्तसंस्था, मुंबई

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार (२५ नोव्हेंबर २०२६) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकरी, विद्यार्थी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या बैठकीत राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील दारिद्रयरेषेखालील आणि डीबीटी योजनेत समाविष्ट नसलेल्या राज्यातील ३३ जिल्ह्यांतील ४२ लाख ३० हजार ७८३ शेतकऱ्यांना पुढील तीन महिने मोफत धान्य वितरित केले जाणार आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना प्रति व्यक्ती एकूण पाच किलो मोफत धान्य दिले जाईल, यात ३ किलो तांदूळ आणि २ किलो गहू यांचा समावेश असेल. या निर्णयामुळे राज्यातील ३३ जिल्ह्यांतील ४२ लाखांहून अधिक शेतकरी कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.

नंदूरबार जिल्ह्यातील नर्मदा तापी वळण योजनेसाठी ५ हजार ५४८ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता. सहा वळण बंधा-यांचे नियोजन. यामाध्यमातून परिसरातील सुमारे २६ हजार ५२६ हेक्टरला सिंचनाचा लाभ तसेच ११.५० मे.वॅ. वीज निर्मिती होणार.

आर्थिक फसवणूक करणाऱ्या संस्थांच्या मालमत्ता जप्तीची प्रक्रीया जलद होणार. त्यासाठी स्वतंत्र एमपीआयडी न्यायाधिकरण स्थापनेबाबत, व नव्वद दिवसांच्या आत प्रकरण निकाली काढण्याची कालमर्यादा. त्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियमामध्ये सुधारणा करण्यास मंजुरी.

महसूल विभागांतील अर्धन्यायिक कामकाजाकरिता महसूल न्यायालय दावा व्यवस्थापन प्रणाली (रेव्हन्यू कोर्ट केस मॅनेजमेंट सिस्टीम) लागू करण्यात येणार.

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६

संपादकीय लेखणीतून...

वाढते अत्याचार चिंतेचे

जगभरातील महिला आणि मुलींवरील हिंसाचार हा सर्वात व्यापक मानवाधिकार उल्लंघनापैकी एक आहे, जो आयुष्यात दर तीनपैकी एका महिलेला प्रभावित करतो. तरीही असंख्य पीडितांसाठी न्याय आवाक्याबाहेरच राहतो. हिंसाचाराची तक्रार करणे, संरक्षण आणि मदत मिळवणे, किंवा गुन्हेगारांना जबाबदार धरणे यांसारख्या अनेकींना अडथळ्यांचा सामना करावा लागतो. कायदे आणि धोरणांमध्ये प्रगती झाली असली तरी, कायदेशीर वचनबद्धता आणि पीडितांना अनुभवावी लागणारी वास्तविकता यांमधील दरी खूप मोठी आहे. भीती, कलंक, भेदभाव आणि अपुरा संस्थात्मक प्रतिसाद यामुळे महिला आणि मुली न्याय मिळवण्यापासून वंचित राहत आहेत. निधीतील कपातीमुळे अत्यावश्यक सेवा आणि महत्त्वपूर्ण आधार देणाऱ्या महिला हक्क संघटना आणखी कमकुवत होत आहेत, विशेषतः अशा महिलांना, ज्यांना आधीच अनेक प्रकारच्या भेदभावाला सामोरे जावे लागते किंवा ज्या वंचित समुदायांमध्ये राहतात.

या वर्षी सन २०२६ साली संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांची "युनाईट-UNiTE" मोहीम न्याय सुनिश्चित करणे, पीडितांचे संरक्षण करणे आणि शिक्षेपासून सुटका होणे- थांबवण्यावर लक्ष केंद्रित करते. ही मोहीम अशा न्यायप्रणालींची मागणी करते, ज्या सर्व महिला आणि मुलींसाठी काम करतील, ज्यात सुरक्षित तक्रार निवारण यंत्रणा, पीडिता-केंद्रित सुलभ सेवा, कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि गुन्हेगार व संस्था या दोघांसाठी अधिक उत्तरदायित्व यांचा समावेश असेल. ही मोहीम हे मान्य करते की महिला आणि मुलींवरील हिंसाचार सर्व ठिकाणी होतो- घरात, कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक ठिकाणी आणि ऑनलाइन आणि हिंसेचे हे प्रकार अनेकदा एकमेकांत मिसळतात व एकमेकांना अधिक तीव्र करतात. महिलांविरुद्ध हिंसाचार निर्मूलन दिन- International Day for the Elimination of Violence Against Women दरवर्षी २५ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस महिलांवर होणाऱ्या शारीरिक, मानसिक, आणि भावनिक अत्याचारांविरुद्ध जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्याचा अंत करण्यास पाऊल उचलण्यासाठी साजरा केला जातो. महिलांविरुद्ध हिंसाचार ही जागतिक समस्या आहे, जी केवळ त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नुकसान पोहोचवत नाही, तर समाजाच्या प्रगतीलाही अडथळा ठरते. घरगुती हिंसा, मानवी तस्करी, लैंगिक शोषण आणि वांशिक भेदभाव यांसारख्या समस्यांमुळे महिला अनेक आव्हानांना सामोऱ्या जातात.

या दिवशी विविध सामाजिक संघटना, शाळा, आणि सरकारी संस्था जनजागृती मोहीम, चर्चासत्रे, आणि कार्यशाळांचे आयोजन करतात. महिलांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण, कायद्यांची माहिती आणि त्यांना आर्थिक स्वावलंबी बनवण्यासाठी विविध योजना राबवल्या जातात. हिंसाचारमुक्त समाज घडवण्यासाठी प्रत्येकाने महिलांचा सन्मान राखणे, समानता प्रस्थापित करणे आणि त्यांना सुरक्षित वातावरण निर्माण करणे, ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. महिलांवरील हिंसाचार निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस २५ नोव्हेंबर रोजी जगभरात साजरा केला जातो.

मिराबल भगिनींची स्मृतीः डोमिनिकन रिपब्लिकमधील पँट्रिया, मिनर्वा आणि मारिया तेरेसा या तीन मिराबल भगिनींनी तेथील हुकूमशाहीविरुद्ध लढा दिला होता. दि. २५ नोव्हेंबर १९६० रोजी त्यांची हत्या करण्यात आली; त्यांच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. संयुक्त राष्ट्रांची मान्यताः संयुक्त राष्ट्र महासभाने सन १९९९ मध्ये ठरावात हा दिवस जाहीर केला.

कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक अत्याचार आणि इतर प्रकारच्या हिंसाचाराबाबत जनजागृती करणे आणि पीडितांना न्याय व संरक्षण मिळवून देणे हा यामागचा उद्देश आहे. मानवी हक्क दिन या काळात लिंग-आधारित हिंसाचाराविरुद्ध १६ दिवसांची जागतिक मोहीम राबवली जाते. या मोहिमेत आशा आणि हिंसाचारमुक्त भविष्याचे प्रतीक म्हणून नारिंगी रंगाचा वापर केला जातो. संयुक्त राष्ट्र महासभेने २५ नोव्हेंबर हा "महिलांवरील हिंसाचार निर्मूलनासाठीचा आंतरराष्ट्रीय दिवस" म्हणून घोषित केला आहे. या दिवसाचा उद्देश जगभरात याबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे, की महिलांवर बलात्कार, घरगुती हिंसाचार आणि इतर प्रकारची हिंसा होते.

प्रेमाच्या नावाखाली घरभेदी गुन्हेगारीचा नवा चेहरा

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये कुटुंब हे विश्वासाचे, सुरक्षिततेचे आणि संस्कारांचे सर्वात मजबूत आधारस्तंभ मानले जाते; परंतु अलीकडच्या काळात आंधळे प्रेम, झटपट श्रीमंतीची हाव आणि वैनीच्या जीवनशैलीचे आकर्षण यामुळे याच कौटुंबिक विश्वासाला आतूनच तडे जाताना दिसत आहेत. बेरोजगार किंवा आर्थिकदृष्ट्या अस्थिर असलेल्या प्रियकराचे महागडे छंद पुरवण्यासाठी आणि त्याच्यासोबत नवे आयुष्य थाटण्याच्या आमिषापोटी तरुणींनी थेट स्वतःच्याच घरातील तिजोऱ्या साफ केल्याच्या घटनांनी संपूर्ण देशाला हादरवून सोडले आहे. घरातील प्रत्येक सदस्याला चाव्या, तिजोरीचे ठिकाण आणि सुरक्षा व्यवस्थेची खडानखडा माहिती असते, ज्याचा गैरफायदा घेऊन कोणताही बाह्य हल्ला न होता घरातूनच लाखो-कोटींचा ऐवज गायब केला जात आहे. उत्तर प्रदेश आणि गुजरातसारख्या राज्यांमध्ये घडलेल्या तीन प्रमुख प्रकरणांनी या गंभीर सामाजिक विकृतीचे वास्तव समोर आणले असून, भावनांच्या आहारी जाऊन तरुणाई कोणत्या थराला जाऊ शकते, याचा हा धक्कादायक पुरावा ठरला आहे.

या मालिकेतील सर्वात ताजी आणि संतापजनक घटना नोव्हेंबर २०२६ मध्ये उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यातील अतर्रा कोतवाली परिसरातील बजरंग नगर मोहल्ल्यात उघडकीस आली. येथील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीने चित्रकूट जिल्ह्यातील रसिन येथील तिचा प्रियकर सतेंद्र याचा व्यवसाय उभा करण्यासाठी आणि लग्नाच्या आमिषामुळे आपल्याच कुटुंबातील तसेच नातेवाईकांच्या दोन घरांतील तिजोऱ्या हळूहळू रिकाम्या केल्या. घराच्या चाव्यांची पूर्ण माहिती असल्यामुळे कोणतेही कुलूप न तोडता तिने गेल्या अनेक महिन्यांपासून सुमारे ८५ ते ९० लाख रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून प्रियकराच्या हवाली केले होते.

आरोपी प्रियकर हे दागिने विकून बुलेट आणि पल्सरसारख्या महागड्या दुचाकी, महागडे मोबाईल तसेच कपड्यांवर पैसे उधळत होता. दागिने गायब झाल्याचे लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांनी पोलिसांत धाव घेतली असता, परिसरातील सीसीटीव्ही चित्रणामध्ये ती मुलगी हातात पिशवी घेऊन बाहेर जाताना दिसली. सखोल चौकशीत तिने गुन्हाची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी प्रियकर सतेंद्र याला अटक करून तुरुंगात पाठवले, तर अल्पवयीन मुलीला पोलीस संरक्षणात घेतले.

या कारवाईत पोलिसांनी आरोपीकडून ५३४ ग्रॅम सोन्याचे २७ नग आणि ८०० ग्रॅम चांदीचे आठ नग असा एकूण ८० लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचा ऐवज, तसेच दोन्ही दुचाकी आणि रोख रक्कम जप्त केली.

बांदा येथील घटनेपूर्वीच मे २०२६ मध्ये उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथे याहूनही अधिक थरारक आणि सुनियोजित गुन्हेगारी कट समोर आला होता. येथील एका पितळ व्यापाऱ्याची २१ वर्षीय मुलगी अरीबा हिने तिचा प्रियकर अरशद वारसी याच्याशी लग्न करून स्वतंत्र आणि ऐषारामाचे आयुष्य सुरू करण्यासाठी स्वतःच्याच घरात १,२०,००,००० रुपयांचा दरोडा टाकण्याचा कट रचला. अरशदकडे पुरेसे पैसे नसल्यामुळे तिने चक्क दरोडेखोरांशी हातमिळवणी करून स्वतःच्याच कुटुंबाची लूट घडवून आणली. या गुन्ह्याची सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, अरीबाने स्वतः रिमोटच्या साहाय्याने मुख्य दरवाजाचा डिजिटल लॉक उघडून दरोडेखोरांना घरात प्रवेश दिला होता. मात्र, पोलिसांच्या तांत्रिक तपासात हा दरोडा बाहेरून नव्हे, तर आतूनच घडवून आणल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत अरीबा, तिचा प्रियकर अरशद आणि त्यांच्या साथीदारांना बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून ४७,२४,००० रुपये रोख रक्कम, दोन चारचाकी गाड्या आणि शस्त्रे जप्त करून या कौटुंबिक विश्वासघाताचा पर्दाफाश केला.

अशा प्रकारची गुन्हेगारी प्रवृत्ती केवळ एकाच राज्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, याचा प्रत्यय सप्टेंबर २०२६ मध्ये गुजरातच्या वडोदरा शहरात घडलेल्या प्रकरणातून आला. वडोदरा येथे श्रेया सिंह नावाच्या एका तरुणीने तिचा प्रियकर दीपक वसावा याचा दैनंदिन खर्च भागवण्यासाठी ती राहत असलेल्या आपल्या मोठ्या काकांच्याच घरावर डल्ला मारला. ज्या नातेवाईकांनी तिला आधार दिला आणि घराचा भाग मानले, त्याच घरातून तिने १०१ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि चांदीचे पैंजण असा एकूण ५,१५,००० रुपयांचा ऐवज चोरून प्रियकराला दिला. घरातील मौल्यवान वस्तू अचानक नाहीशा झाल्याने कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. गोरवा पोलिसांनी अत्यंत वेगाने तपास चक्र फिरवत या चोरीचा छडा लावला आणि श्रेया तसेच तिचा प्रियकर दीपक या दोघांनाही अटक केली. या प्रकरणात पोलिसांनी कौतुकास्पद कामगिरी करत चोरीला गेलेला १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करून कुटुंबीयांना परत मिळवून दिला. या तीनही घटनांचा सखोल अभ्यास केल्यास असे दिसून येते की, ही केवळ चोरीची किंवा दरोड्याची प्रकरणे नसून, तो आजच्या तरुण पिढीतील भावनिक अपरिपक्वतेचा आणि मूल्यांच्या ऱ्हासाचा गंभीर परिणाम आहे.

समाजमाध्यमांवरील झगमगाट, महागड्या वस्तूंचे आकर्षण आणि बेरोजगार किंवा संधिसाधू जोडीदाराकडून होणारे भावनिक शोषण यामुळे अनेक तरुणी योग्य-अयोग्याचे भान हरवून बसत आहेत. ज्या आई-वडिलांनी आणि नातेवाईकांनी आयुष्यभराची कमाई कष्टाने साठवली, त्यांनाच फसवून एका अनिश्चित भविष्यामागे धावणे हा केवळ कायदेशीर गुन्हा नाही, तर सामाजिक आणि नैतिक अधःपतन आहे. पोलिसांची तत्परता आणि सीसीटीव्हीसारख्या तंत्रज्ञानामुळे चोरीला गेलेली संपत्ती कदाचित पुन्हा मिळू शकेल, परंतु एकदा तुटलेला कौटुंबिक विश्वास सांधणे जवळपास अशक्य असते. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांशी केवळ आर्थिक नव्हे, तर भावनिक संवाद वाढवणे आणि तरुणाईने खऱ्या प्रेमाचा व आर्थिक स्वाथार्चा फरक ओळखणे, हीच काळाची सर्वांत मोठी गरज बनली आहे.

निष्कर्ष :

आंधळ्या प्रेमाच्या आहारी जाऊन स्वतःच्याच कुटुंबाची संपत्ती लुटण्याच्या घटना या केवळ गुन्हेगारीच्या नव्हे, तर भावनिक अपरिपक्वतेच्या आणि नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाच्या गंभीर निदर्शक आहेत. प्रेमाच्या नावाखाली आर्थिक स्वार्थ, वैनीची हाव आणि भावनिक शोषण यांना बळी पडणे म्हणजे आयुष्यभर जपलेल्या कौटुंबिक विश्वासाला तिलांजली देण्यासारखे आहे. पैसा आणि दागिने पुन्हा मिळवता येतील; मात्र एकदा तुटलेला विश्वास आणि दुखावलेली नाती पुन्हा जोडणे कठीण असते.

त्यामुळे पालकांनी मुलांशी मोकळा संवाद साधणे, तरुणाईने प्रेम आणि स्वार्थ यांतील फरक ओळखणे तसेच कोणत्याही नात्यात विवेक आणि जबाबदारी जपणे आवश्यक आहे. कारण खरे प्रेम कधीही आपल्या माणसांच्या कष्टाच्या कमाईवर डल्ला मारायला शिकवत नाही; उलट त्यांच्या विश्वासाचे आणि सन्मानाचे रक्षण करायला शिकवते.

- ९५६१५१४३०६

झलकारीबाई कोळी: झांशी सेनापती बुंदेलखंड विरांगणा

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

झांशी सेनापती बुंदेलखंड विरांगणा झलकारीबाई कोळी (२२ नोव्हेंबर १८३० - ४ एप्रिल १८५८) ही एक स्त्री लढवय्या होती, जिने सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात एक महत्त्वाची भूमिका बजावली. तिने झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या स्त्री लष्करात काम केले. हिचा जन्म दि. २२ नोव्हेंबर १८३० रोजी कोळी समाजात झाला. पुढे ती झांशीची राणी लक्ष्मीबाईची एक प्रमुख सल्लागार झाली. झांशीच्या किल्ल्याचे युद्ध पेटलेले असताना ती स्वतः राणी म्हणून गादीवर बसली आणि राणीच्या बाजूने आघाडीवर लढली, त्यामुळे राणीला किल्ल्यातून पळून जाणे शक्य झाले होते. वीरांगना झलकारीबाई या १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यातील एक धाडसी महिला सैनिक आणि झांशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या विश्वासू सल्लागार होत्या. त्यांचा जन्म दि. २२ नोव्हेंबर १८३० रोजी झाशीजवळील भोजला गावात एका कोळी कुटुंबात झाला.

दि. २२ नोव्हेंबर १८३०, भोजला गाव (झाशीजवळ), जमुना देवी आणि सदोबा सिंह, मृत्यूः ४ एप्रिल १८५८, भूमिकाः १८५७ च्या बंडात महिला सैन्यात सहभाग आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रमुख सल्लागार.

शौर्य आणि योगदानः झाशीच्या किल्ल्यावरील वेढ्याच्या वेळी झलकारीबाईनी राणी लक्ष्मीबाईचा वेश धारण करून आघाडीवर लढा दिला. त्यांच्या या धाडसामुळे राणी लक्ष्मीबाईना किल्ल्यातून सुरक्षित बाहेर पडण्यास मदत झाली. त्यांच्या स्मरणार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध करण्यात आले असून झाशी किल्ल्याजवळ संग्रहालय आणि पुतळा उभारण्यात आला आहे. झलकारीबाई संबंधातील कथा कित्येक शतके बुंदेलखंडातील लोकांच्या स्मरणात आहे. तिचे आयुष्य, खास करून राणीला वाचवण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीच्या सेनेशी लढतानाचे तिचे धैर्य, याची बुंदेली लोकसाहित्यात आजही स्तुती केली जाते. तिचे शौर्य आणि तिची कोळी ही ओळख यामुळे उत्तर भारतातील शाक्यांमधे स्वाभिमान आणि सांस्कृतिक ऐक्याची भावना निर्माण होण्यास मदत झाली.

जीवनः झाशीजवळ असलेल्या भोजला गावामध्ये दि.२२ नोव्हेंबर १८३० मध्ये सदोबा सिंग आणि जमुना देवी यांच्या पोटी झलकारीबाईचा जन्म झाला. एका खेडेगावातल्या मुलीच्या वाट्याला येतात, ती सर्वच कामे झलकारीबाई करत असे. तरी तिच्या लहानपणामध्येच तिने काही अचंबित करणाऱ्या बाबी करून आपल्याकडे इतरांचे लक्ष वेधले होते. स्थानिक लोक गीतांमध्ये झलकारीच्या वीरतेविषयी अनेक उदाहरणे गातात. झलकारीबाईनी कमी वयातच वाघाला कुऱ्हाडीने मारल्याची कथा सांगितली जाते. तसेच झलकारीबाई गायी वळायला गेलेल्या असताना त्यांनी एका चित्त्याला काठीने मारल्याची कथाही तेव्हढीच प्रसिद्ध आहे. राणी लक्ष्मीबाईच्या सैन्यातील तोफखान्याचा काम करणाऱ्या पूरण सिंग नावाच्या सैनिकाशी तिचा विवाह झाला होता. ज्याने झलकारीबाईंची ओळख राणी लक्ष्मीबाईशी करून दिली होती. झलकारीबाई राणी लक्ष्मीबाई सारखीच दिसायची आणि यामुळे तिला लक्ष्मीबाईच्या स्त्रियांच्या पलटणीमधे सहभागी करून घेतले गेले.

युद्धातील शौर्य - राणीच्या सैन्यात तिला वेगाने बढती मिळत गेली आणि लवकरच ती स्वतःच्या सैन्याच्या तुकडीचे नेतृत्व करू लागली. सन १८५७ च्या बंडाच्या दरम्यान ह्युज रोज यांच्या नेतृत्वाखालील सैन्याने झाशीवर आक्रमण केले. त्या दरम्यान राणी तिच्या किल्ल्यात स्वतःच्या ४००० सैनिकांसह दबा धरून बसली होती.

वैभव सूर्यवंशीचा विश्वविक्रमी धडाका! क्रिकेटच्या इतिहासाला हादरा देणारी ५३ चेंडूंची वादळी खेळी

२८ षटकार, ७ चौकार, २०४ धावा ! अवघ्या २८ चेंडूंत शतक, ५२ चेंडूंत द्विशतक; विक्रमांच्या मैदानावर १५ वर्षीय वैभवचे अधिराज्य!

डॉ. दत्ता विघावे,
क्रिकेट समीक्षक

क्रिकेटमध्ये विक्रम जन्माला येतात, काही विक्रम मोडले जातात आणि काही विक्रम असे असतात की ते मोडण्याची कल्पनादेखील धाडसाची वाटते. मात्र, वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी वैभव सूर्यवंशीने जे काही करून दाखवले, त्याने क्रिकेटविश्वाला अक्षरशः स्तब्ध केले आहे. फलंदाजी म्हणजे केवळ कौशल्य, तंत्र आणि संयम यांचा खेळ, ही पारंपरिक व्याख्या त्याने आपल्या आक्रमक फलंदाजीने नव्याने लिहिली आहे. दोहा येथे संयुक्त अरब अमिरातीविरुद्ध त्याने केलेला धावांचा महाप्रलय म्हणजे केवळ एका युवा फलंदाजाची खेळी नव्हती, तर आधुनिक एकदिवसीय क्रिकेटच्या क्षमतेचे विलक्षण दर्शन होते. एखाद्या अनुभवी फलंदाजाला ५० षटकांच्या सामन्यात द्विशतक करण्यासाठी किती वेळ लागेल, वैभवने अवघ्या ५२ चेंडूंत द्विशतकाचा टप्पा गाठला! हा आकडा वाचतानाही विश्वास बसणार नाही, अशी त्याची कामगिरी आहे.

गोलंदाजांची दाणादाण;
विक्रमांची अक्षरशः लयलूट

एसीसी रायझिंग स्टार्स आशिया चषक स्पर्धेत भारत अ संघासमोर संयुक्त अरब अमिरातीने ८ बाद २४९ धावांचे आव्हान उभे केले होते. विजयासाठी २५० धावांची गरज असताना भारताच्या डावाची सुरुवात करणाऱ्या वैभवने पहिल्याच षटकापासून प्रतिस्पर्धी गोलंदाजांवर हल्ला चढवला. अभिषेक शर्मा लवकर बाद झाला, प्रभसिमरन सिंगलाही मोठी खेळी करता आली नाही; मात्र दुसऱ्या बाजूला वैभवचा धडाका थांबण्याचे नाव घेत नव्हता. त्याने अवघ्या १६ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर २८ चेंडूंत शतक, ४० चेंडूंत दीडशतक आणि ५२ चेंडूंत द्विशतक असा अविश्वसनीय प्रवास केला. त्याच्या ५३ चेंडूंच्या खेळीत तब्बल २८ षटकार आणि ७ चौकारांचा समावेश होता. म्हणजेच २०० धावांहून अधिक धावा त्याने केवळ सीमारेषेबाहेर चेंडू भिरकावून मिळवल्या, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. त्याचा स्ट्राइक रेट ३८४.९० च्या आसपास होता.

विक्रमांची नवी व्याख्या

वैभवच्या या खेळीने लिस्ट ए क्रिकेटमधील विक्रमांची पुस्तकेच बदलून टाकली.

* २८ चेंडूंत शतक - लिस्ट ए क्रिकेटमधील सर्वात वेगवान शतक.
* ४० चेंडूंत दीडशतक - नवा विश्वविक्रम.
* ५२ चेंडूंत द्विशतक - लिस्ट ए क्रिकेटमधील सर्वात वेगवान द्विशतक.
* २८ षटकार - एका लिस्ट ए डावातील फलंदाजाचे सर्वाधिक षटकार.
* २०४ धावा - अवघ्या ५३ चेंडूंत केलेली ऐतिहासिक खेळी.

यापूर्वी ऑस्ट्रेलियाच्या जेक फ्रेझर-मॅकगर्कने २९ चेंडूंत लिस्ट ए शतक झळकावले होते. वैभवने त्यापेक्षाही एक चेंडू कमी घेत शतक पूर्ण केले. न्यूझीलंडच्या चॅड बोवेसने १०३ चेंडूंत द्विशतक करण्याचा विक्रम केला होता. वैभवने तो विक्रम अक्षरशः धुळीस मिळवला.

रिंकू सिंगची साथ; भारताचा अविश्वसनीय विजय

वैभवच्या या वादळी खेळीला रिंकू सिंहची साथ मिळाली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी अवघ्या ४३ चेंडूंत १३७ धावांची भागीदारी केली. रिंकूने १५ चेंडूंत १९ धावा करत वैभवला अधिकाधिक स्ट्राइक मिळवून देण्याची भूमिका बजावली. वैभव बाद झाला तेव्हा भारताला विजयासाठी केवळ पाच धावांची गरज होती. त्यानंतर रिंकूने षटकार ठोकून भारताचा विजय निश्चित केला. भारत अ संघाने अवघ्या १४.२ षटकांत २५० धावांचे लक्ष्य गाठत सात गडी राखून दणदणीत विजय मिळवला आणि उपांत्य फेरीतील स्थान निश्चित केले.

दोन अपयशांनंतर विश्वविक्रमी प्रत्युत्तर

या खेळीतील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे वैभवची मानसिकता. नेपाळविरुद्ध ३२ चेंडूंत २६ धावा आणि पाकिस्तान अ विरुद्ध १३ चेंडूंत ११ धावा अशा दोन निराशाजनक खेळींनंतर त्याच्यावर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक होते. पाकिस्तानकडून भारत अ संघाला पराभवही स्वीकारावा लागला होता. मात्र, टीका किंवा अपयशाने खचून न जाता त्याने आपल्या बॅटमधून उत्तर दिले. विशेष म्हणजे खेळपट्टी गोलंदाजांना फारशी मदत करत नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने आक्रमणाची गती वाढवली. ही केवळ ताकदीची फलंदाजी नव्हती, तर परिस्थितीचे आकलन करून खेळण्याची क्षमताही होती.

वैभव सूर्यवंशी : प्रतिभेचा चमत्कार की भारतीय क्रिकेटचे नवे पर्व ?

वैभवच्या यशाकडे केवळ षटकार आणि विक्रमांच्या चष्म्यातून पाहून चालणार नाही. अवघ्या पंधराव्या वर्षी त्याने ज्या आत्मविश्वासाने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गोलंदाजांचा सामना केला, ते त्याच्या अफाट प्रतिभेचे निदर्शक आहे. यापूर्वी आयपीएलमध्येही त्याने आपल्या फलंदाजीची ताकद सिद्ध केली आहे. २०२६ च्या आयपीएलमध्ये ७७६ धावा आणि स्पर्धेत सर्वाधिक ७२ षटकार ठोकत त्याने आपली क्षमता अधोरेखित केली. जुलै २०२६ मध्ये इंग्लंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पण करून तो भारताचा सर्वात कमी वयाचा पुरुष आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू ठरला. परंतु येथे एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित करावासा वाटतो. वैभवची तुलना लगेच सचिन तेंडुलकर, विराट कोहली किंवा रोहित शर्मा यांच्याशी करण्याची घाई करू नये. कारण विक्रम करणे आणि सातत्याने महानता सिद्ध करणे यात मोठा फरक आहे. एका अविश्वसनीय खेळीने प्रतिभेची ओळख होते; मात्र दीर्घ कारकीर्द घडवण्यासाठी तंत्र, संयम, फिटनेस, मानसिक कणखरता आणि परिस्थितीनुसार खेळण्याची क्षमता आवश्यक असते. त्याच्या नैसर्गिक आक्रमकतेला लगाम घालण्याऐवजी योग्य मार्गदर्शनाने अधिक प्रभावी बनविण्याची जबाबदारी भारतीय क्रिकेट व्यवस्थापनाची आहे. प्रसिद्धीच्या झगमगाटापासून त्याला दूर ठेवून क्रिकेटचा आनंद घेता येईल, असे वातावरण निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.



विक्रम वैभवचे, पण अपेक्षांचे ओझे भारतीय क्रिकेटचे

आज भारतीय क्रिकेटला असा फलंदाज मिळाला आहे, जो गोलंदाजांच्या मनात सामन्यापूर्वीच धडकी भरवू शकतो. २८ षटकारांची आतषबाजी, २८ चेंडूंचे शतक आणि ५२ चेंडूंचे द्विशतक ही आकडेवारी पुढील अनेक वर्षे चर्चेत राहणार आहे. विशेष म्हणजे वैभवने एका डावात १९६ धावा चौकार आणि षटकारांतून मिळवल्या. उर्वरित धावा धावून पूर्ण केल्या. म्हणजेच त्याच्या फलंदाजीतील आक्रमकतेबरोबरच धावांची भूकही स्पष्ट झाली. दोहाच्या मैदानावर आज केवळ एका सामन्याचा निकाल लागला नाही, तर एका नव्या क्रिकेट पर्वाची चाहूल मिळाली. गोलंदाजांच्या रणनीतीला आव्हान देणारा, क्षेत्ररक्षणाची मांडणी निरर्थक ठरवणारा आणि प्रेक्षकांना प्रत्येक चेंडूवर खुर्चीतून उभे करणारा एक नवा धडाकेबाज चेहरा भारतीय क्रिकेटला मिळाला आहे. वैभव सूर्यवंशीने आज द्विशतक केले, पण त्याहून मोठी गोष्ट म्हणजे त्याने क्रिकेटविश्वाच्या कल्पनाशक्तीला नवे पंख दिले. आता त्याच्याकडून प्रत्येक सामन्यात द्विशतकाची अपेक्षा करण्यापेक्षा त्याला मोठा क्रिकेटपट्टू होण्यासाठी वेळ, संधी आणि योग्य मार्गदर्शन देणे आवश्यक आहे. कारण एक विक्रमांची आतषबाजी एक दिवस थांबेल; पण योग्य पद्धतीने घडवलेली प्रतिभा अनेक वर्षे भारतीय क्रिकेटला उजळवू शकते. आज वैभवने गोलंदाजांना धडकी भरवली आहे; उद्या त्याच्या नावाने क्रिकेटच्या इतिहासात नवे अध्याय लिहिले जातील, अशी आशा बाळगायला निश्चितच हरकत नाही!

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

'ॲग्रोव्हिजन २०२६' व जलपरिषदेचे २७ नोव्हेंबर रोजी भव्य उद्घाटन

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, जलसंवर्धन मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री पंकज भोयर व आशिष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती, दुष्काळाचा सामना : पाणी व्यवस्थापन आणि पीक नियोजन मध्यवर्ती संकल्पना, तयारी अंतिम टप्प्यात

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, संशोधन आणि शेतीतील नव्या संधींची माहिती मिळावी, तसेच बदलत्या हवामानाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनविण्याच्या उद्देशाने आयोजित मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन 'ॲग्रोव्हिजन २०२६' आणि जलपरिषदेचा भव्य उद्घाटन सोहळा शुक्रवार, २७ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे.

अमरावती रोडवरील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर सकाळी १०.३० वाजता होणा-या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री व ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक नितीन गडकरी राहणार आहेत. जलपरिषदेचे उद्घाटन मृदा व जलसंवर्धन मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते होणार आहे. राज्यमंत्री पंकज भोयर व आशिष जयस्वाल यांच्या सह आयसीआरआयएसएटी, हैदराबादचे महासंचालक डॉ. हिमांशु पाठक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या व माफसू नागपूरच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांची उपस्थिती राहणार आहे.

'दुष्काळाचा सामना : पाणी व्यवस्थापन आणि पीक नियोजन' ही यंदाच्या ॲग्रोव्हिजनची मध्यवर्ती संकल्पना आहे. या चार दिवसीय कृषी महोत्सवात अक आणि स्मार्ट तंत्रज्ञानाच्या माध्यमातून एकात्मिक कृषी नियोजनावर विशेष भर देण्यात येणार आहे. शिक्षण, प्रशिक्षण आणि सक्षमीकरण या त्रिसूत्रीवर गेली १६ वर्षे वाटचाल करणाऱ्या ॲग्रोव्हिजनने शेतकरी, कृषी तज्ज्ञ, संशोधक, उद्योजक, तंत्रज्ञान क्षेत्र आणि शासन यांच्यात ज्ञानाची देवाणघेवाण घडवून आणली आहे. कार्यशाळा, कृषी प्रदर्शन आणि परिसंवाद यांच्या माध्यमातून आधुनिक शेतीचे ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा प्रयत्न आहे.

विदर्भातील शेतकऱ्यांसमोर असलेल्या दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी यंदाच्या ॲग्रोव्हिजनमध्ये पाणी व्यवस्थापन, जलसंधारण आणि पीक नियोजन या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.



कमी पाण्यात अधिक उत्पादन घेणे, उपलब्ध जलस्रोत यांचा प्रभावी वापर, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि शेतीतील नव्या प्रयोगांबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

विविध विषयांवर विशेष कार्यशाळा आयोजित केल्या आहेत, ज्या मध्ये २७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता 'कृषी क्षेत्रातील स्टार्टअप्स आणि माहिती तंत्रज्ञान' या विषयावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता 'दुष्काळात पशुसंगोपन व चाऱ्याचे नियोजन' या विषयावर, तर दुपारी २ वाजता 'बायोचार व सेंद्रिय घटकांद्वारे जमिनीतील कार्बन सुधारणा' या विषयावर कार्यशाळा होईल. यावेळी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

२९ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता 'एआय व आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे कमी पाण्यात ऊस उत्पादन' या विषयावरच्या कार्यशाळे करिता महाराष्ट्राचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित राहणार आहेत. तर दुपारी ३ वाजता 'गोड्या पाण्यातील मत्स्यपालन व विदर्भातील संधी' विषयावरच्या कार्यशाळे करिता महाराष्ट्राचे मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. ३० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता 'विदर्भातील समूह आधारित उत्पादनांवर आधारित FPO' या विषयावर, तर दुपारी २ वाजता 'दुष्काळात अकचा वापर करून संत्रा बागांचे नियोजन' या विषयावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी राष्ट्रीय कृषी प्रदर्शन २७ ते ३० नोव्हेंबर दरम्यान दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत आणि दुपारी १२ ते सायंकाळी ५ या वेळेत शेतकऱ्यांसाठी विविध कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, नवीन उपकरणे, संशोधन, शेतीतील नव्या पद्धती आणि शेतीपूरक व्यवसायांची माहिती या प्रदर्शनातून मिळणार आहे.

सोमवार, ३० नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता ॲग्रोव्हिजन २०२६ चा समारोप समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी अध्यक्षस्थानी असतील. रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शेतकऱ्यांनी या चार दिवसीय कृषी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

पत्रकार परिषदेला ॲग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी. डी. मायी, आयोजन सचिव रवी बोरटकर व रमेश मानकर तसेच ॲग्रोव्हिजन सल्लागार समितीचे डॉ. शरद गडाख, डॉ.विलास खर्चे, डॉ. इंद्रमणी मिश्रा, डॉ.एन.जी. पाटील, डॉ. व्हि.एन. वाघमारे, डॉ. एस.के. शुक्ला, एम.जी. शेंबेकर, कॅ. डॉ.एल.बी. कलंत्री, रीना सिन्हा, शिरीष भगत, सुधीर दिवे, आनंदराव राऊ त, मिलींद टिचकुले, प्रशांत कुकडे, प्रशांत वासाडे, श्रीधर ठाकरे, विजय जाधव, डॉ. पिनाक दंदे, डॉ. सुनिल सहातपुरे, माधव कोटस्थाने, डॉ. के. डी. ठाकूर, नितीन कुळकर्णी, डॉ. हितेंद्र सिंग, मारेश्वर वानखेडे, दिनेश ठाकरे, दिनेश सूर्यवंशी, राकेश मानकर, किरण पातुरकर, मनोज जवंजाळ, समय बन्सोड, डॉ. प्रकाश कडू, नरेंद्र जिवतोडे, बोरटकर आदि मान्यवर उपस्थित होते.

थोडक्यात

गजानन खापरे यांची भाजप बुनकर प्रकोष्ठ नागपूर-विदर्भ संयोजकपदी नियुक्ती

पक्षाची जबाबदारी निष्ठेने पार पाडणार; कार्यकर्त्यांकडून स्वागत व सत्कार



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चौहान यांच्या निर्देशानुसार, बुनकर प्रकोष्ठ प्रभारी मनोज दिवटे यांनी गजानन खापरे यांच्यावर बुनकर प्रकोष्ठाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली त्यांची नागपूर - विदर्भ संयोजकपदी नियुक्ती केली आहे. या नियुक्तीबद्दल गजानन खापरे यांनी पक्षातील वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले असून, पक्षाने दिलेली जबाबदारी पूर्ण निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने पार पाडण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. मध्य नागपुरातील आमदार प्रवीणजी दटके, अध्यक्ष श्याम चटिकर, नगरसेवक तुषार लारोकर आणि प्रभाग चे नगरसेवक हेमंत बरडे, किशोरजी उमरेडकर वार्ड अध्यक्ष, मनीष नंदनवार आणि सोबत असंख्य कार्यकर्त्यांनी गजानन खापरे यांच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

ब्राह्मण सेवा मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सावरकर नगर येथील प्राथमिक शाळेत २२ नोव्हेंबर रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात पार पडली. सावरकर नगर प्राथमिक शाळेत झालेल्या वार्षिक सभेच्या अध्यक्षस्थानी मिलिंद निमदेव होते. सर्व प्रथम सचिव हेमंत पडळकर यांचे प्रास्ताविक भाषण झाले. त्यानंतर अजेंड्या नुसार काम सुरू झाले. मागील वर्षीचे मिनीट,अकाऊंट अणि पुढील वर्षीचे बजेट सर्वानुमते मंजूर झाल्यानंतर अध्यक्ष मिलिंद निमदेव यांचे भाषण झाले.आपल्या सविस्तर भाषणात निमदेव यांनी ब्राह्मण सेवा मंडळ या आपल्या संस्थेच्या गतीविधींची माहिती दिली. बीएसएम मुख्यत्वेकरून गरजू ब्राह्मण यांना मदत करणे या प्रमुख उद्दिष्टने सुरू करण्यात आली आहे. त्या उद्दिष्ट पूर्ती करिता सर्व कार्यकर्ते झटून काम करतात. रुग्ण साहित्य केंद्र, औषध वाटप, जुने कपडे, अन्नदान असे बरेच उपक्रम ३२ मार्फत राबविले जातात. संस्थेच्या भविष्यातील उद्दिष्टांचा पण निमदेव यांनी उहापोह केला.

लवकरच वृद्धांसाठी आनंदाश्रम सुरू करणार आहे. त्यानंतर धनंजय जोशी यांचा सत्कार करण्यात आला. त्यांची pharmacists असोसिएशनच्या महाराष्ट्र अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सगळ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. डॉ. देशपांडे यांनी आपल्या उद्बोधन पर भाषणात हृदय विकार, मधुमेह व उच्च रक्तदाब या विषयावरील सगळ्यांचे शंका समाधान केले. कोषाध्यक्ष आनंद बडे यांच्या आभार प्रदर्शनात त्यांनी सर्व मेंबर्स अणि डॉ. पी. के देशपांडे यांचे विशेष आभार मानले. संचालन श्वेता गर्गे यांनी केले. बैठकीला नवीन उपाध्यक्ष प्रणिता देशमुख आणि नवीन सह कोषाध्यक्ष श्रीपाद चोरघडे यांनी आपला कार्यभार स्वीकारला. अन्य कार्यकारी मंडळ सदस्य रविन्द्र जोशी, दिलीप चंद्रायन, प्रतिमा देमुनिंकर, राधिका बाकरे, दिनेश ठेकाडे, किरण पथे, शेखर गावपांडे, अभय राजदेकर या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी खूप मेहेनत घेतली.

'सक्षम'चा दिवाळी मिलनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दिव्यांगाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या समष्टि क्षमताविकास एवं अनुसंधान मंडळ (सक्षम) नागपूर महानगर तर्फे प्रताप नगर कार्यालयात लक्ष्मी पूजन व दिवाळी मिलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सक्षम नागपूर महानगर आणी दिव्यांग सक्षमीकरण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने संगीतमय कार्यक्रम " दिव्यरंग दिव्यांगाचे " आयोजन करण्यात आले होते.विशेष म्हणजे या कार्यक्रमात सहभागी सर्वच गायक कलाकार दिव्यांग होते.गायक अपूर्वा नामदेव, ईश्वरी पांडे, शोएब शेख, सुरेश आगडे आणि संध्या कापकर सुनील पारेख यांनी एकाहून एक सरस गाणी गायली अन् उपस्थित सर्वांचे मनं जिंकले. या संगीतमय कार्यक्रमाचे संगीत नियोजन गणेश गायकवाड, श्रीमती स्नेहल पाटील, प्रल्हाद देवधरे यांचे होते. संगीतमय कार्यक्रमाचे संचालन अर्चना श्रावणे यांनी केले. या कार्यक्रमात स्मिताताई जैन यांनी समुपदेशन केले. तसेच लक्ष्यवेध स्पोर्ट्स अकादमीचे श्री उपासनी यांनी दिव्यांग स्पोर्ट्स बाबत मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्ताविक सक्षमचे नागपूर महानगर सहसचिव मनीष केसरवानी यांनी केले तसेच सक्षम नागपूर महानगर अध्यक्ष डॉ मिलिंद हरदास यांनी आभार प्रदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चनाताई श्रावणे यांनी केले. या कार्यक्रमाला समाज कल्याण दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे अधिक्षक प्रवीण मेंढे, सक्षम चे केंद्रीय महासचिव उमेश अंधारे, विदर्भ प्रांत संघटन मंत्री आशुतोष देशपांडे, डॉ. जयाश्री शिवालकर, जेष्ठ कार्यकर्ता डॉ. के. डी. देशपांडे, शिरिषजी दारव्हेकर, डॉ. अरूंधती भावे, संध्याताई दारव्हेकर, आनंद सहस्त्रबुद्धे, प्रचार प्रसार प्रमुख रवींद्र पांडे, विदर्भ प्रांत उपाध्यक्ष रामदेव अग्रवाल इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वते साठी महानगर सचिव संजय पाटील, सहसचिव सचीन देशपांडे, दिनेश देशपांडे, कोषाध्यक्ष अरुण पलांदुरकर, कमल किशोर सारडा, दिनेश शर्मा, उदय राव , संजय बोभाटे, जयश्रीताई देशपांडे, अंजलीताई वाघ, प्रज्ञाताई राऊत इत्यादी नी काम केले.

सालई फाटा जवळ अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक; ६२ वर्षीय व्यक्ती गंभीर जखमी

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

२५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील सालई फाटा जवळ अज्ञात वाहनाने दुचाकीला



जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात सुरेश चिंचबाजी देशभतार (वय ६२, रा. सावनेर, जि. नागपूर) हे गंभीर जखमी झाले आहेत. ते पांढुर्णा येथून सावनेरकडे येत असताना हा अपघात घडला. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून पायाला फ्रॅक्चर झाले आहे. अपघाताची माहिती राजेंद्र पारवे यांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी तात्काळ पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर यांना घटनेची माहिती दिली.

त्यानंतर केळवद पोलीस व महामार्ग पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमी व्यक्तीला हितज्योती आधार फाउंडेशनच्या अॅम्बुलन्सने सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी नागपूर मेडिकल हॉस्पिटल येथे रवाना करण्यात आले. अपघात घडवून घटनास्थळावरून पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा शोध केळवद पोलीस घेत आहेत.

शाखा कालव्यासाठी शेतकऱ्यांचे आमरण उपोषण सुरू

गोसेखुर्द मोखाबार्डी उपसा सिंचन योजनेचा लाभ देण्याची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

मालेवाडा व नांद सर्कल परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गोसेखुर्द मोखाबर्डी उपसा सिंचन कालव्यातून शाखा कालवा उपलब्ध करून द्यावा, २४ नोव्हेंबरपासून सुनील सवई यांचे अन्नजलत्याग आंदोलन व ग्रामस्थांचे आमरण उपोषण सुरू आज तिसरा दिवस आहे.

मालेवाडा व नांद सर्कलमधील शेतकरी कोरडवाहू शेतीवर अवलंबून आहेत. परिसरातील विहिरी कोरड्या पडल्या असून बोअरवेललाही सुमारे १०० फुटांपर्यंत पाणी लागत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मोठ्या तलावाचा किंवा नदीचा आधार नसल्याने पाण्याअभावी उभी पिके डोळ्यांसमोर नष्ट होत आहेत.



परिणामी शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून नापिकीमुळे कर्जबाजारीपणा वाढत असल्याचेही सांगण्यात आले आहे.

गोसेखुर्द मोखाबार्डी उपसा सिंचन कालवा जवळपास पूर्णत्वास आला असून त्यातून शाखा कालवा काढल्यास परिसरातील उखडी, सालेभट्टी, भगवाणपूर, सायगाव, खडकाढा, पोळगांव,नांद, बेसूर, चिखलापार, महालगाव, आलेसूर, खापरी,खोलडोडा, धामणगांव, तिडकेपार, शिवापूर, तांडा, नाड, शिवनफड, कवडशी, चारगाव, मांडवा, खंडाझरी, वणी, चनोडा, लोणारा या सर्व गावांतील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळू शकतो.

प्रस्तावित शाखा कालवा सालेभट्टी, भगवानपूर, नांद, बेसूर, चिखलापार, महालगाव आदी परिसरातून पुढे नेण्याची मागणी करण्यात आली आहे. या शाखा कालव्यामुळे सुमारे ३० गावांतील शेतजमिनी सिंचनाखाली येऊन कोरडवाहू शेतीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागू शकतो, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. नागपूर पाटबंधारे विभागामार्फत सूरू असलेल्या गोसेखुर्द मोखाबार्डी उपसा सिंचन योजनेच्या जवळील जोड कालव्यापासून शाखा कालवा काढण्याचा आदेश संबंधित विभागाला द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

आंदोलनाचा टप्पा निश्चित

निवेदनानुसार, २४ व २५ नोव्हेंबर रोजी भगवानपूर येथे आमरण उपोषण व अन्नजलत्याग आंदोलन सुरू आहे. त्यानंतर २६ व २७ नोव्हेंबर रोजी तहसील कार्यालय, भिवापूर येथे आंदोलन करण्यात येईल. मागणीची पूर्तता न झाल्यास न्याय मिळेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर समोर आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे. शाखा कालवा उपलब्ध करून देऊन मालेवाडा व नांद सर्कलमधील शेतकऱ्यांना सिंचनाचा कायमस्वरूपी मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडास्पर्धेत कोल्हापूर परिमंडल संघाला अजिंक्यपद

नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडल व पुणे-बारामती संघ उपविजेता



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महावितरणच्या २०२६-२७ च्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत कोल्हापूर परिमंडल संघाने वर्चस्व गाजवत सर्वसाधारण अजिंक्यपद पटकावले. तर पुणे-बारामती व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडल संघाना स्पर्धेतील उपविजेतेपद विभागून देण्यात आले. यावेळी महावितरणचे संचालक राजेंद्र पवार (मानव संसाधन) व कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे(भा.प्र.से) यांच्या हस्ते अजिंक्यपदाचा करंडक विजेत्या संघास देण्यात आला.

महावितरणच्या कोल्हापूर येथे दि.२१ नोव्हेंबरपासून साधेपणाने आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेचा समारोप मंगळवारी (दि. २४) सायंकाळी पोलीस ग्राऊंड, कसबा बावडा येथे झाला. यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, नागपूर प्रादेशिक संचालक(प्रभारी) राजेश नाईक, मुख्य अभियंते पंकज तगलपल्लेवार, धर्मराज पेठकर, दत्तात्रय बनसोडे, दिलीप दोडके, संजय पाटील, हरीश गजबे, अरविंद बुलबुले, स्वप्नील काटकर, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत महावितरणच्या १६ परिमंडलाच्या संयुक्त आठ संघातील १२४६ खेळाडूपैकी ४०१ महिला व ८४५ पुरुष खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेतील सांघिक व वैयक्तिक विजेते व उपविजेत्यांना करंडक व सुवर्ण/रौप्य/कांस्य पदक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता स्वप्नील काटकर यांनी केले. सूत्रसंचालन रामगोपाल अहिर, बाजीराव आबिटकर व सुरेश पाटील यांनी केले. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी शिरीष काटकर यांनी आभार मानले.

सांघिक खेळांचे अंतिम निकाल - अनुक्रमे विजेता व उपविजेता

क्रिकेट - कल्याण-रत्नागिरी व छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर, व्हॉलिबॉल- कोल्हापूर व पुणे-बारामती, कबड्डी- पुरुष मुख्य कार्यालय-भांडूप व पुणे-बारामती, महिला- मुख्य कार्यालय-भांडूप व पुणे-बारामती, खो-खो- पुरुष- पुणे-बारामती व कोल्हापूर, महिला- मुख्य कार्यालय-भांडूप व कोल्हापूर, टेबल टेनिस - पुरुष- छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर व नाशिक-जळगाव, महिला- नागपूर-गोंदिया-चंद्रपूर व कोल्हापूर, बॅडमिंटन - पुरुष- पुणे-बारामती व कल्याण-रत्नागिरी, महिला- कोल्हापूर व नागपूर-गोंदिया-चंद्रपूर, कॅरम - पुरुष- छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर व नागपूर-गोंदिया-चंद्रपूर, महिला- नागपूर-गोंदिया-चंद्रपूर व कल्याण-रत्नागिरी, ब्रिज - नागपूर-गोंदिया-चंद्रपूर व कोल्हापूर, टेनिक्वाईट- महिला- कोल्हापूर व नागपूर-गोंदिया-चंद्रपूर, कुस्ती - कोल्हापूर व पुणे बारामती, पॉवर लिफ्टिंग - नाशिक-जळगाव व नागपूर-गोंदिया-चंद्रपूर, शरीरसौष्ठव - कोल्हापूर व कल्याण-रत्नागिरी

थोडक्यात

तारसा फाटा येथील श्री. हनुमान सेवा बहुउद्देशिय संस्थेतर्फे कार्तिक टिपूर पौर्णिमा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

दरवर्षीप्रमाणे वंदाही तारसा फाटा येथील श्री हनुमान सेवा बहुउद्देशीय संस्थेतर्फे कार्तिक टिपुर पोर्णिमा निमित्त मंगळवार (ता.२४ नोव्हेंबर) ला दहीकाला, झाकी महातांडव, शिव पार्वती विवाह तसेच महाप्रसादाचे थाटात आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्याक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन माजी जि प सदस्या शालिनी देशमुख, माजी जि प सदस्या नंदा लोहबरे, तारसा ग्रा पं सरपंचा वैशाली लेंडे, उपसरपंच चंद्रशेखर गभणे, पोलीस पाटील शुभम गिरडकर, माजी सरपंच तथा तारसा फाटा येथील प्रतिष्ठित नागरिक बाळकृष्ण खंडाईत सह गावातील, परिसरातील, तालुक्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक श्री हनुमान सेवा बहुउद्देशीय संस्था तारसा फाटा चे अध्यक्ष विनोद दहेकर, उपाध्यक्ष श्रीरंग डोकरीमारे, सचिव शंकर मानकर, नथ्थु राजगीरे, ललीत महाराज, शंकर वाढई, हरिचंद्र झंझाड, अमीत डोकरीमारे, अभिषेक बालपांडे, नवनित वाढीभस्मे, प्रविण मानकर, शंकर फुलझेले, सोहम हिंगे, राजु कुलरकार, नागेश्वर घोडमारे, आकाश गोमासे, चेतन हिंगे, मंगेश राऊत, सोनु हारोडे, सतिश हारोडे, शोर्य दहेकर यांनी परिश्रम घेतले व संपुर्ण तारसा फाटा येथील समस्त नागरिकांनी सहकार्य केले.

मागेल त्या शेतकऱ्याच्या शेताजवळील नाल्यावर ताडपत्री बंधारा : राज्यमंत्री जयस्वाल



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू :मौदा

यंदा कोरडा दुष्काळ जाहीर झाल्याने, शेतकऱ्यांच्या रब्बी पिकाला, जनावरांना, नागरिकांना उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई भासू नये म्हणून मौदा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात नदी व नाल्यावर ताडपत्री बंधारे बनविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. अरोली येथील सूर नदीवर बनविलेल्या ताडपत्री बंधारा पाहण्यासाठी मंगळवार (ता. २४ नोव्हेंबर)ला राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी भेट दिली असता, मागेल त्या शेतकऱ्याच्या शेताजवळील नाल्यावर ताडपत्री बंधारा बनवून देण्यात येईल, त्या शेतकऱ्यांनी फक्त मला फोन करून सांगावे, असे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, ताडपत्री बंधाऱ्यामुळे धावणारा पाणी चालतो, चालणारा पाणी थांबून साठवतो व थांबणारा पाणी जमिनीत मुरतो. त्यामुळे पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी, गावातील सार्वजनिक व खाजगी बोरवेल यांच्या पाण्याची पातळी खोलवर जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी व नागरिकांनी राज्य शासन व आर्ट ऑफ लिविंग यांच्या पुढाकाराने बनविण्यात येत असलेल्या ताडपत्री बंधाऱ्यास सहकार्य करावे असे आव्हान त्यांनी याप्रसंगी केले. यावेळी त्यांनी आर्ट ऑफ लिविंगचे रंजीत घिवतोंडे हे त्यांच्या सहकाऱ्यांसह दिवसभर नदी,नाल्यावर उभे राहून बंधाऱ्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून घेत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी तालुका शिवसेनाप्रमुख प्रशांत भुरे, अरोली सरपंचा रोशनी प्रशांत भुरे, माजी जि प उपाध्यक्ष सदानंद निमकर, अरोली सर्कलचे भाजप नेते विष्णू देशमुख, रोशन उमप,माजी उपसरपंच कैलास समरीत, ग्रामपंचायत सदस्य दिनेश डहारे,सामाजिक कार्यकर्ते गणेश बावनकुळे, अरोली थानेदार सागर गोमासे सह शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'संवैधानिक मूल्ये आणि आपण' विषयावर २६ नोव्हेंबरला व्याख्यान

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत मूल्ये आणि लोकशाही व्यवस्थेत नागरिकांची भूमिका याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने विदर्भ साहित्य संघाच्या वतीने संविधान दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन गुरुवार, २६ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथसहवास, सीताबर्डी येथे दुपारी ३ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात 'संवैधानिक मूल्ये आणि आपण' या विषयावर आंबेडकरी विचारांचे अभ्यासक डॉ. अजय चिकाटे मार्गदर्शन करणार आहेत. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. या कार्यक्रमाला साहित्यप्रेमी, अभ्यासक आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाने केले आहे.

महावितरणच्या निष्काळजीपणाचा आणखी एक बळी

पूर्णा : उर्जा राज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच महावितरणच्या कंत्राटी कामकाजातील निष्काळजीपणाचा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पूर्णा तालुक्यातील रुपला पांढरी येथे दि. १८ नोव्हेंबर रोजी महावितरणच्या विद्युत कामादरम्यान भागवत पांडुरंग संबोड (वय २२, रा. गोविंदपूर) या तरुणाला विजेचा जोरदार धक्का बसला होता. यात गंभीर जखमी झालेल्या भागवतला नादिड येथील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, मृत्यूशी सुरू असलेली त्याची झुंज दि. २४ नोव्हेंबर रोजी संपली. या घटनेमुळे महावितरणच्या कंत्राटी कामांमधील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी कुटुंबियांनी केली आहे.

मनपातर्फे महिलांसाठी संगणक प्रशिक्षण वर्ग



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महिला व बाल कल्याण समितीचा निर्णय

नागपूर महानगरपालिकेतर्फे महिलांना संगणक प्रशिक्षण, ई-रिक्षाचे वाटप व हाऊसकिपिंगचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय महिला व बाल कल्याण विशेष समितीने घेतला.

मनपाच्या महिला व बाल कल्याण विशेष समितीची बैठक सभापती सारिका नांदूरकर यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. २३) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात पार पडली. यावेळी समितीच्या उपसभापती तारा (लक्ष्मी) यादव, महेश्वरी बिसेन, चेतना निमजे, कु. लक्ष्मी हत्तीठेले, शीला तराळे, कल्पना द्रोणकर, तसनीम परवीन नियामत खान ताजी यांच्यासह अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम, समाज विकास विभागाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे उपस्थित होते.

मनपाच्या समाज विकास विभागातर्फे महिला व मुलींसाठी विविध योजना राबविल्या जात असल्याची माहिती उपायुक्त डॉ. लाडे यांनी यावेळी दिली. यावेळी शालेय मुलींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप, शहरात पाच रात्रीचे निवारे आहेत. यात २५० लाभार्थी आहे. याशिवाय शहरात २ भिक्षेकरी गृह असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. महिला व मुलींसाठी मनपाच्या १४ वेगवेगळ्या योजना असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

महिलांमध्ये संगणक साक्षरता वाढविण्यासाठी महिलांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात यावे. यासाठी राज्य सरकारच्या मान्यता प्राप्त असलेल्या संस्थांकडे हे प्रशिक्षण देण्यात यावे, अशी सूचना करण्यात आली. त्याचप्रमाणे महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढविण्यासाठी ई-रिक्षा देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. याशिवाय हॉटेल मॅनेजमेंट, हाऊस किपींग, वाहन प्रशिक्षणाचे वर्ग आयोजित करावे, अशी सूचना सभापती सारिका नांदूरकर यांनी यावेळी केली.

मनपातर्फे संचालित अनुसयाबाई काळे समुपदेशन केंद्रासाठी प्रत्येक झोनमध्ये स्वतंत्र जागा उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना यावेळी अनेक सदस्यांनी केली. यासंदर्भात प्रशासनाने योग्य कारवाई करावी, असे निर्देश सारिका नांदूरकर यांनी दिले. याशिवाय प्रत्येक झोनमध्ये महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजित करावे, सर्व योजनांची अंमलबजावणी तात्काळ करावी, अशी सूचना यावेळी करण्यात आली.

धरमपेठ झोन अंतर्गत अनधिकृत रस्ता फुटपाथवरील लोकांना हटविण्याची मोहिम



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिका धरमपेठ झोन क्र. २, अंतर्गत दि. २५/११/२०२६ रोजी नागपूर शहर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने व्हेरायटी चौक ते झांसी राणी चौक ते पंचशिल चौक ते यशवंत स्टेडियम, मुंजे चौक येथे कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान फुटपाथवर अतिक्रमण करुन राहत असलेल्या लोकांना संस्थेमध्ये स्थानांतरीत करण्यात आले व त्यांचे भांडे, कपडे, साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे फुटपाथ आणि मुख्य रस्ता अतिक्रमणांपासून मुक्त करण्यात आला आहे. यात १५ महिला आणि १० पुरुषांचा समावेश आहे.

सदर कारवाई आयुक्त मनपा नागपूर, पोलीस आयुक्त नागपूर शहर, उपायुक्त वाहतुक, नागपूर यांच्या संयुक्तिक मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अतिक्रमण निर्मुलन कारवाई मधे धरमपेठ झोन चे सहाय्यक आयुक्त राजकुमार मेश्राम, अतिक्रमण पथक धरमपेठ झोन, एन.डी.एस अधिकारी व कर्मचारी संपूर्ण कार्यवाहीमध्ये उपस्थित होते. नागरिकांना आणि वाहनधारकांना होणारा वाहतुकीचा त्रास कमी करणे तसेच शहरात फुटपाथ नागरिकांना मोकळे करुन देने हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. आगामी दिवसांत शहरातील इतर प्रमुख मार्गावरही अशाच प्रकारची कडक कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

तीन मराठी व एका सिंधी एकांकिकांचे प्रभावी सादरीकरण

२१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचा तिसरा दिवस

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : कला सागरच्या वतीने आणि विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलनाच्या सहकार्याने आयोजित २१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी तीन मराठी आणि एका सिंधी एकांकिकांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. विश्वोदय बहुउद्देशीय जनकल्याण संस्था, नागपूर प्रस्तुत लक्ष्मीकांत वदि लिखित व रुपाली वदि दिग्दर्शित 'आई भाड्याने देणे आहे !', वत्सल क्रिएशन सांस्कृतिक मंडळ, नागपूर प्रस्तुत श्याम आस्करकर लिखित व दिग्दर्शित 'द लास्ट वर्किंग ड', आणि रिअल क्रियेटीव्ह आई फाउंडेशन नागपूर प्रस्तुत रवींद्र नारायण गुजर लिखित व दिग्दर्शित 'बॉंधिनी' या एकांकिकांनी विविध सामाजिक आणि कौटुंबिक विषय मांडले. सिंधी कौन्सिल ऑफ इंडिया लेडीज चैप्टर खामला नागपूर प्रस्तुत किशोर लालवाणी दिग्दर्शित 'हसियुं मायूं बिमार पुळण' हे सिंधी नाटक सादर झाले.



मोर हिंदी भवन परिसरातील स्व. रामगोपाल माहेश्वरी सांस्कृतिक सभागृहात सुरू असलेल्या या महोत्सवाची सुरुवात आज तिसऱ्या दिवशी डॉ. पंजाबराव देशमुख नागरिक सह. पत संस्थेचे अध्यक्ष विलास गावंडे, देवश्री प्रॉपर्टीजचे संचालक राजेश सावरकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक मधू घाटे यांच्यासह कलासागरचे मुख्य संरक्षक व सचिव, अध्यक्ष रविशेखर गिल्लूरकर, कार्याध्यक्ष सुशील तिवारी, उपाध्यक्ष रवींद्र बिजवे, कोषाध्यक्ष डॉ. रमेश बारस्कर, सहसचिव रूपाली वंजारी आणि सविता पांडे उपस्थित होते.

'चेकमेट' आणि 'मुखवटे'मधून माणुसकीचा वेध

६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सत्ता, महत्त्वाकांक्षा, विश्वास, नातेसंबंध आणि माणुसकीच्या विविध पैलूंवर भाष्य करणारी 'चेकमेट' आणि 'मुखवटे' ही नाटके महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत बुधवारी सादर करण्यात आली.

डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात ही स्पर्धा सुरू आहे. श्री सद्गुरूकृपा बहुउद्देशीय संस्था प्रस्तुत 'चेकमेट' हे नाटक सतेपर्यंत पोहोचण्यासाठी खेळले जाणारे डावपेच आणि त्या प्रवासात माणसांच्या भावना, संघर्ष व स्वप्नांकडे होणारे दुर्लक्ष यावर नाटक भाष्य करते. स्वार्थापलीकडे जाऊन दुसऱ्याच्या वेदना समजून घेणे आणि माणुसकीची बाजू घेणे किती महत्त्वाचे आहे, याची जाणीवही नाटक करून देते. या नाटकाची निर्मिती दिप्ती व गौरी भाके यांनी केली असून लेखन व दिग्दर्शन तन्मय गोंधे यांचे होते. नेपथ्य शिवम नारायण, प्रकाश योजना प्रणव कोरे, संगीत संयोजन स्तवन गवारे, वेशभूषा तेजस्विनी सदावर्ती आणि रंगभूषा रिया गुप्ता यांनी सांभाळली. नाटकात आकांक्षा भाके, प्राची व्यवहारे, रौनक पळसापुरे, अर्णव घाटोळे, श्रेयस दलाल, मानस एलगुंदे, ऋतुजा कुमरे, रुपेश गोंगल, मयुर चिंतलवार, रोहित भोयर, यशस्वी बनसोडे आणि मिहिका मुरकुटे यांनी विविध भूमिका साकारल्या.

श्री पिराजी बहुउद्देशीय संस्था प्रस्तुत 'मुखवटे' या नाटकातून माणसाच्या चेहऱ्यावर दिसणारा चेहरा आणि मनात दडलेला खरा चेहरा यातील फरक अधोरेखित करण्यात आला. अमोल मारुती रेडीज लिखित या नाटकाचे दिग्दर्शन निकेतन विजय शहारे यांनी केले होते. यात रिद्धिमा लांजेवार (बालकलाकार), श्वेता सेलोकर, अरविंद परते, प्रवीण बोन्दे, नितीन श्रीखंडे, निखिल दांडेकर, प्रणिता वावरे-जागणेकर, रोशन बालपांडे आणि पूर्वा वाकोडे यांनी साकारल्या. रंगमंच व्यवस्था अभिजात हटवार व सुफिया अंसारी, नेपथ्य निकेतन शहारे व सपन राऊत, संगीत संयोजन निकेतन शहारे, प्रकाश योजना अनिल भालेराव, वेशभूषा पूर्वा वाकोडे व रंगभूषा श्वेता सेलोकर यांचे होते.

बालजगत दीपावली स्नेहमिलन कार्यक्रम संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दीनदयाल शोध संस्थान, बालजगत आयोजित व स्वरवेद प्रस्तुत दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात व संगीताच्या सुरेल मैफलीत संपन्न झाला. या कार्यक्रमाचे संगीत संयोजन रवी सातफळे यांनी केले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दीनदयाल शोध संस्थानचे प्रधान सचिव, निखिलजी मुंडले उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी निखिलजी मुंडले व मीनल मुंडले यांच्या हस्ते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी निखिलजी मुंडले यांनी आपल्या मनोगतातून बालजगतच्या कार्याची व विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना करून दिली.

संगीतमय कार्यक्रमाची सुरुवात गायक विशाल देशपांडे व यशश्री भावे यांनी सादर केलेल्या 'सूर निरागस हो' या सुरेल गीताने झाली. त्यानंतर पल्लवी दामले यांनी 'दिस चार झाले मन' हे गीत सादर करून रसिकांची दाद मिळवली. प्रसिद्ध गायक निलेश सावरकर यांनी 'माझे माहेर पंढरी' आणि 'कानडा राजा पंढरीचा' ही भक्तिरसपूर्ण गीते सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. रवी सातफळे-तबला, आशिष सुपारे - ऑक्टोपॅड, श्रीकांत मारवडकर -सिंथेसायझर यांनी वाद्यांची साथ संगत केली. या संगीतमय मैफलीला उपस्थित रसिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. संपूर्ण वातावरण गीत-संगीताने भारावून गेले.

या प्रसंगी बालजगतचे अध्यक्ष अभिनंदन पळसापुरे, उपाध्यक्ष पंकज महाजन, मार्गदर्शक जयंत जोशी आणि सचिव संजय भाकरे, गौरी सरनाईक, वैशाली दामले, विवेकजी तरासे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे निवेदन मनोज वैद्य यांनी केले. आभार प्रदर्शन सचिव संजय भाकरे यांनी केले. अनुजाताई परचुरे यांच्या मार्गदर्शनात माधवी जोशीराव, सायली जतकर, निकिता लुटे, अविनाश बाजूजवार, शरद पेदगे, सुनील उमाठे, मॉंजिरी घाटे, विनंती पाठक, वैशाली कडव, चेतन बावनकर या बालजगतच्या सर्व कार्यकर्त्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे हा दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

बॉलिवूडच्या दिग्गजांकडून कौतुकाची थाप मिळालेला 'जिजाई' चित्रपट गाजतोय

नागपूरचे युवा दिग्दर्शक तृषांत इंगळे यांचे होत आहे कौतुक

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य, स्वतःच्या आत्मसन्मानासाठी उभे राहण्याची जिद्द आणि स्त्रीच्या सामर्थ्याची प्रभावी कथा सांगणारा 'जिजाई' हा मराठी चित्रपट २० नोव्हेंबरपासून राज्यभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. अभिनेत्री रिंकू राजगुरू हिची मध्यवर्ती भूमिका असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन नागपूरचे युवा दिग्दर्शक तृषांत फुलवंती इंगळे यांनी केले आहे. विशेष म्हणजे, चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित होताच बॉलिवूडमधील अनेक दिग्गज कलाकारांनी त्याचे कौतुक करत संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या होत्या.



बुधवारी व्हीआर मॉल, मेडिकल चौक येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिग्दर्शक तृषांत इंगळे, अभिनेत्री सानिका दिवाण आणि अभिनेते काजल रंगारी यांनी चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेविषयी, कथानकाविषयी आणि कलाकारांच्या अनुभवांविषयी माहिती दिली. राजमाता जिजाऊ यांच्या धैर्य, नेतृत्व आणि कणखर व्यक्तिमत्त्वापासून प्रेरणा घेत अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या एका निर्भीड स्त्रीची कथा 'जिजाई'मधून मांडण्यात आली आहे. स्त्री ही केवळ अन्याय सहन करणारी नसून, स्वतःच्या संरक्षणासाठी आणि आत्मसन्मानासाठी समर्थपणे लढा देऊ शकते, हा विचार चित्रपटातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. मैत्री, दडलेली सत्ये आणि एका सामान्य स्त्रीचे असामान्य रूप यांची उत्कंठावर्धक गुंफणही चित्रपटाच्या कथानकात पाहायला मिळते.

चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर त्याने केवळ मराठी प्रेक्षकांचेच नव्हे, तर हिंदी चित्रपटसृष्टीतील मान्यवरांचेही लक्ष वेधून घेतले. अभिनेता रितेश देशमुख, कुमुद मिश्रा, के. के. मेनन, निवेदिता भट्टाचार्य, दिग्दर्शक सुरेश त्रिवेणी, वासन बाला, गीतकार-संगीतकार स्वानंद किरकिरे, मनीष चौधरी आणि सिद्धार्थ जाधव यांच्यासह अनेक कलाकारांनी सोशल मीडियावर ट्रेलर शेअर करत चित्रपटाच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

झी स्टुडिओज प्रस्तुत आणि झी स्टुडिओज व कोकोनट फिल्म्स निर्मित या चित्रपटात रिंकू राजगुरू हिच्यासोबत किशोर कदम, मयूर मोरे, रोहित कोकाटे, काजल रंगारी आणि सानिका दिवाण यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. नुपूर गुहा आणि तुषार राऊत हे चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद प्रसाद वांधरे व विनोद जाधव यांनी लिहिले असून, अतिरिक्त पटकथा व संवादांची जबाबदारी तृषांत इंगळे यांनी सांभाळली आहे. संगीत व पार्श्वसंगीत गुलराज सिंह यांचे आहे.

थोडक्यात

ग्रामीण जनतेच्या आर्थिक प्रगतीसाठी सहकारी क्षेत्राचे व बँकेचे हात अधिक मजबूत करा : राज्यमंत्री जयस्वाल



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

महाकवी कालिदास ग्रामीण बिगरशेती सहकारी पत संस्थेच्या नगरधन शाखेचा उदघाट्न समारंभ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचे शुभ हस्ते नुकताच नगरधन येथे पार पडला."ग्रामीण भागतील जनतेला सुलभ रीतीने बँकिंग व्यवहार करता यावा आणि ग्राहकांना उपलब्ध होत असलेली दर्जेदार सेवा अधिक चांगल्या प्रकारे उपलब्ध होऊन ग्रामीण जनतेची आर्थिक समृद्धी व्हावी तसेच शेतकरी, गरजू व बँकेशी सुरुवातीपासून जुळलेल्या ग्राहक वगार्चे हित जोपसण्यासाठी नगरधन येथील शाखा उघडल्याचे,"संस्थेचे अध्यक्ष अनिल कोल्हे यांनी सांगितले.

बँकेच्या उदघाट्नप्रसंगी मार्गदर्शन करतांना राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले की, "सहकारी बँका आणि सहकार क्षेत्र ग्रामीण क्षेत्राच्या प्रगती आणि विकासात महत्वाच्या आहेत. महाकवी कालिदास सहकारी पत संस्थेने गेल्या अनेक वर्षापांसून संस्थेचे अध्यक्ष अनिल कोल्हे यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनात ग्राहकांचा विश्वास संपादन करून त्यांना अत्यन्त दर्जेदार सेवा उपलब्ध करून दिली. त्यांच्या या कार्यात संचालक मंडळ व त्यांचे सर्व कार्यालयीन सहकारी, अभिकर्ता यांनी मोलाची साथ दिली. जनतेनेही त्यांच्या सोबत राहून कोणत्याही खोट्या अफवेला बळी न पडता त्यांच्या सोबत राहून बँक अधिक बळकट केली पाहिजे. यातून जनतेला त्यांचा विकास आणि आर्थिक प्रगती निश्चितपणे साधता येईल."असे बहुमूल्य विचार व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर रामटेकचे नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन,माजी जी प सदस्य नरेश धोपटे, माजी सरपंच प्रशान्त कामडी, डॉ.रामसिंग सहारे, सुखलाल दमाहे, आनंद रामेलवार,संचालक मंडळातील रश्मी चकोले, शंकर बलगेवार, भोजराज शिरोडे, नारायण घरज्हाडे, प्रदीप ठाकरे, मधुकर बिसने, हरिश हूड, पुष्पा गोल्हर, सुरेखा लिल्हारे,सुनील कोल्हे, बी एच तांबूलकर, राजाराम पोकळे सदस्यगण, व्यवस्थापक राजकुमार सहारे, प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी परिसरातील प्रतिष्ठित गणमान्य नागरिक, ग्राहक व सभासद वर्ग,कर्मचारी वर्ग , एजन्ट प्रामुख्याने उपस्थित होते.

दुष्काळी अनुदानापासून वंचित शेतकऱ्यांना तातडीने ५ हजार रुपये द्या,अन्यथा आंदोलन

युवक काँग्रेसचा तहसीलदारांना निवेदनातून इशारा; आमगाव तालुक्यातील ६० टक्के शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळाली नसल्याचा दावा



दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

आमगाव तालुका दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आला असतानाही तालुक्यातील अनेक गावांमधील पात्र शेतकरी अद्याप दुष्काळी अनुदानापासून वंचित असल्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शासनाने दुष्काळी मदत म्हणून पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपये देण्याची तरतूद केली असली, तरी आमगाव तालुक्यातील सुमारे ६० टक्के शेतकऱ्यांना अद्याप या अनुदानाचा लाभ मिळालेला नसल्याचा दावा युवक काँग्रेसने केला आहे. वंचित शेतकऱ्यांना तातडीने अनुदान वितरित करावे, अन्यथा शेतकऱ्यांसह लोकशाही मागनि तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा युवक काँग्रेसने प्रशासनाला दिला आहे. या मागणीसाठी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दीपक देशकर यांच्या नेतृत्याखाली बुधवारी तहसीलदार, आमगाव यांना निवेदन सादर करण्यात आले.

शासनाने आमगाव तालुका दुष्काळग्रस्त घोषित केल्यानंतर शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, आजही तालुक्यातील अनेक गावांमधील बहुतांश पात्र शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. दुष्काळाचा सामना करणाऱ्या प्रत्येक पात्र शेतकऱ्याला शासनाच्या मदतीचा लाभ मिळणे हा त्यांचा हक्क आहे. शासनाने अनुदानाची घोषणा करूनही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणे ही गंभीर बाब असल्याचे युवक काँग्रेसने निवेदनात नमूद केले आहे.

निवेदनातून युवक काँग्रेसने पाच प्रमुख मागण्या प्रशासनासमोर मांडल्या आहेत. त्यामध्ये अनुदानापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांची गावनिहाय यादी तयार करणे, अनुदान वितरणातील अडचणी व प्रलंबित प्रकरणांची तातडीने तपासणी करणे, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना अनुदान वितरणाचे काम पूर्ण करण्याचे निर्देश देणे, उर्वरित पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांचे अनुदान देण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे तसेच अनुदान वितरणाची सद्यस्थिती आणि पुढील कार्यवाहीबाबत शेतकऱ्यांना स्पष्ट माहिती देणे, या मागण्यांचा समावेश आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन वंचित पात्र शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी. अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी युवक काँग्रेसला शेतकऱ्यांसोबत रस्त्यावर उतरून लोकशाही मागनि आंदोलन करावे लागेल, असा स्पष्ट इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. खासदार प्रतिनिधी दुर्ग्यंत नामदेव कीरसान, तालुकाध्यक्ष संजय बहेकार, गोंदिया जिल्हा सचिव इसुलाल भालेकर, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष पिंकेश शेडे, युवक काँग्रेस अध्यक्ष दीपक देशकर, आनंद भावे, मुन्नीलाल उईके, कमलेश उके, दीपक उके, राकेश नागपुरे, राजाराम कुकरे, राजकुमार मेश्राम, कोमल कुमरे, आशिष शिगाडे, राहुल चव्हाण, पुरुषोत्तम नागपुरे, नितीन सयाम, हर्षद वाहने, विशाल उके, अनिकेत कोरे, ऋतिक कुमरे, पिनेश कुमरे, प्रविणा बोरकर, शीतल बोरकर, जीवन, सुमित, प्रणय, जितेंद्र गौतम यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खिंडसी तलाव परिसरातील सात गावांच्या क्षेत्रात १ हजार एकरवर चारा लागवड

चारा टंचाई निवारणासाठी प्रशासनाच्या उपाययोजना, मका, सुपर नेपीयर आणि बाजरी लागवडीचे नियोजन, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची मान्यता



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी रामटेक तालुक्यातील खिंडसी तलाव परिसरातील सात गावांच्या हद्दीतील गाळपेर जमिनीवर चारा लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. या सातही गावांमध्ये प्रत्येकी १५० एकर याप्रमाणे एकूण १ हजार ५० एकर क्षेत्रावर चारा लागवड करण्यात येणार आहे. या नियोजनाला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मान्यता दिली आहे.

गाळपेर क्षेत्रातील चारा लागवडीच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, रामटेकचे उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. अर्चना कडू, पशुसंवर्धन विभागाचे श्री. बळी, गटविकास अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जमिनीतील पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन पिकांची निवड करण्यात आली आहे. पाण्याचे स्रोत उपलब्ध असलेल्या जमिनीवर मका, मध्यम स्वरूपाचा पाणीसाठा असलेल्या जमिनीवर सुपर नेपीयर, तर कमी पाणी उपलब्ध असलेल्या जमिनीवर बाजरीची लागवड करण्यात येणार आहे. याशिवाय उर्वरित जमिनीवर गोशाळा आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना चारा लागवडीसाठी परवानगी देण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

चारा लागवडीच्या नियोजनासाठी रामटेक तालुकास्तरीय गाळपेर समिती गठीत करण्यात आली आहे. तहसीलदार हे समितीचे अध्यक्ष, तर तालुका पशुसंवर्धन



अधिकारी सदस्य सचिव असतील. गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच पाटबंधारे व लघुपाटबंधारे विभागाचे अभियंते समितीचे सदस्य राहणार आहेत. रामटेकच्या धर्तीवर जिल्ह्यातील अन्य तालुक्यांमध्येही तालुकास्तरीय समित्या स्थापन करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

व्हीबी-जी राम जी योजनेंतर्गत चारा लागवड

व्हीबी-जी राम जी योजनेंतर्गत गाळपेर क्षेत्रात मका, बाजरी आणि सुपर नेपीयरची लागवड गाळपेर समितीच्या मान्यतेनंतर करण्यात येणार आहे. जिल्ह्यात आतापर्यंत तीन कोटी रुपयांचे ७७ हजार ५०० किलो बियाणे वितरित करण्यात आले आहे. बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध असून, ज्या शेतकरी किंवा संस्थांना बियाणे आवश्यक आहे त्यांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

लागवड केलेल्या चारा पिकांची छायाचित्रे सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच नगरपरिषद क्षेत्रातील गायरान आणि गाळपेर जमिनीवरही चारा लागवडीचे नियोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

रक्तदानातून संविधान मूल्यांचा जागर, अभिजीत दीपके यांच्या हस्ते उद्घाटन

समता सैनिक दल, प्रेरणादीप बहुउद्देशीय संस्था आणि टीम धम्मा फेस्टिव्हलचा संयुक्त पुढाकार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी आणि मानवतेच्या सेवाभावातून नागपुरातील संविधान चौक येथे २६ नोव्हेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समता सैनिक दल, प्रेरणादीप बहुउद्देशीय संस्था आणि टीम धम्मा फेस्टिव्हल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन काँग्रेसचे जनता पार्टीचे(सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांच्या हस्ते होणार आहे. गुरुवारी, २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता संविधान चौक येथे शिबिराला सुरुवात होईल. संविधानाने दिलेल्या समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांचा जागर करत सामाजिक उत्तरदायित्व जपण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, तसेच समाजात रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण व्हावी, या हेतूने शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान हे केवळ दान नसून एखाद्याला जीवनदान देण्याची संधी आहे. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी प्रदीप गणवीर (८३२९४५२६७७) यांच्याशी संपर्क साधावा.

टेबूरडोहजवळ भीषण अपघात, एकाची प्रकृती चिंताजनक, दोघे गंभीर जखमी

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

पोलीस स्टेशन खापा हद्दीतील टेबूरडोहजवळ मंगळवारी (दि. २४ नोव्हेंबर २०२६) रात्री ८.१५ वाजताच्या सुमारास अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात दुचाकीवरील दोघे जण गंभीर जखमी झाले असून त्यापैकी एका जखमीची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अँक्टिव्हा दुचाकी क्रमांक MH 40 DM 7843 ही चारगावच्या दिशेने जात असताना विरुद्ध दिशेने येणाऱ्या अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की दुचाकीवरील दोघेही रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाले. अपघातात आशिष पांडुरंग अंबाडरे (वय २७, रा. सर्रा, पोस्ट नागलवाडी, तालुका सावनेर, जिल्हा नागपूर) यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. तर आकाश शांताराम कोहळे (वय ३२, रा. तायगाव खैरी, तालुका सौसर, मध्यप्रदेश) यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे.



या अपघाताची माहिती मयूर जिचकार यांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी तत्काळ खापा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत काळे यांना घटनेची माहिती दिली. दोन्ही जखमी यास हितज्योती आधार फाउंडेशन ॲम्ब्युलन्स ने सावनेर सरकारी हॉस्पिटल दाखल केले असता प्राथमिक उपचार करून नागपूर मेडिकल हॉस्पिटल रवना केले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक चंद्रकांत काळे, पोलीस उपनिरीक्षक एकनाथ राठोड आणि पोलीस हवालदार प्रकाश नांदूरकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून अपघाताची माहिती घेतली असून धडक देऊन पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा शोध सुरू केला आहे. अपघात करून जखमींना रस्त्यावर सोडून पसार होणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. अशी भावना गावकरी यांनी व्यक्त केली घटनांमुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अपघातग्रस्तांना वेळेत मदत मिळणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच अपघात करून पळ काढणाऱ्या वाहनांचा शोध घेणेही आवश्यक आहे. या प्रकरणात खापा पोलीस अज्ञात वाहनाचा शोध घेत असून पुढील तपास सुरू आहे.

चोर मस्त पोलीस सुस्त, घरफोडी करुन चोरट्यांनी लॅपटॉप व दुचाकी केली लंपास



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर पोलीस स्टेशन हद्दीत वाढत्या चोरीच्या घटनांनी स्थानिक पोलीस अधिकारी कर्मचारी व स्वताला लेडी सिंघम समजणाऱ्या थानेदार ऋतुजा जाधव यांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत वाढते अवैध धंदे, गावठी दारु, गांजा, एमडी पावडर सारख्या अमली पदार्थांची सुलभतेनी उपलब्धता,निरंतर वाढते रस्ते अपघात, टवाळखोरी, सोबतच नियमितपणे होत असलेल्या घरफोडी मुळे स्थानिक पोलीसांच्या कार्यशैली सोबतच त्यांच्या रात्रकालीन गस्तीवरही संशयास्पद नजरेने बघितले जात असुन नागरिकात आपल्या मालमत्तेच्या सुरक्षीततते बाबत चिंतेत आहे.

दि. २२/११/२०२६ रोजी संध्याकाळी ६:०० वाजता मंगेशकुमार दामोदर देव्हारे (रा. शक्तीनगर, वाघोडा, ता. सावनेर) हे पत्नी व मुलीसह नागपूर येथे बहिणीकडे कार्यक्रमासाठी गेले होते आणि रात्री १०:०० वाजता शिंगोरी येथे नाईट शिफ्टसाठी गेले असता घरी त्यांची आई एकटीच होती.

२३/११/२०२६ रोजी सकाळी ड्युटी संपल्यानंतर पत्नी व मुलीला घेऊन परत येताना मुलीला शाळेत सोडून ते व त्यांची पत्नी सकाळी अंदाजे ९:१५ वाजता घरी पोहोचले तेव्हा त्यांना दरवाजा उघडा, कडी कापलेली व कुलुप कंपाउंड वॉलमध्ये पडलेले दिसले.

अज्ञात चोराने घरात प्रवेश करून बेडरूममधील कपाटातील कपडे अस्ताव्यस्त केले आणि देवघर रूममधील स्टडी टेबलवरून सन २०१३ मध्ये घेतलेला आसुस कंपनीचा जुना लॅपटॉप अंदाजे किंमत ५,०००/- तसेच कंपाउंडमध्ये ठेवलेली होंडा ॲक्टिव्हा मोपेड २०,०००/- असा एकूण २५,०००/- चा माल चोरून नेला. या तोंडी रिपोर्टच्या आधारे पोलीस स्टेशन सावनेर येथे २३/११/२०२६ रोजी कलम ३०५(अ) व ३३१(४) अन्वये गुन्हा नोंदवून तपास करत आहे.

ठाण्यातून माहिती मिळणे झाले कठीण

ठाणा परिसरात घडलेल्या घटना, दुर्घटना, अपघात, चोरी ईत्यादी सह अन्य गुन्ह्याची माहिती प्रसार माध्यमांना वेळीच मिळणे आवश्यक असुनही जेव्हा स्थानिक पत्रकार माहिती संकलनाकरीता पोहचतात तर स्टेशन डायरीवर गुन्ह्याची नोंद व्हायची आहे. साहेबांना येऊ द्या ते माहिती देतील, तपास सुरु आहे. सध्यातरी माहीती देता येणार नाही सोबतच वरिष्ठांकडून माहिती देण्याची परवानगी नाही असे म्हणत टाळले जात आहे.

नांदच्या रस्त्यावर चाकूचा धाक दाखवून २० हजार लुटले!

मित्रानेच दिली लुटीची टिप, दोघे आरोपी पोलिसांच्या जाळ्यात, १.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

निर्जन रस्त्याचा फायदा घेत चाकूचा धाक दाखवून प्रवाशाला लुटण्याचा प्रकार खोलदोडा-धामणगाव मार्गावर घडला. मात्र, या लुटीमागील सूत्रधार दुसरा-तिसरा कुणी नसून फिर्यादीसोबत प्रवास करणारा त्याचाच मित्र असल्याचे पोलीस तपासात उघड झाले. मित्रानेच दिलेल्या माहितीवरून दोघांनी लुटीचा डाव आखला होता. भिवापूर पोलिसांनी या प्रकरणाचा छडा लावत दोघांना अटक केली असून, त्यांच्याकडून दुचाकीसह एकूण १ लाख ३६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कवडू वामनराव देवके (रा. नांद) हे मित्र प्रफुल्ल रामचंद्र मेश्राम याच्यासोबत कामानिमित्त चंद्रपूर येथे गेले होते. तेथून मोपेडसह चिमूर मार्गे नांदकडे परतत असताना २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० ते ७ वाजताच्या सुमारास खोलदोडा-धामणगाव मार्गावरील निमझरी फाट्याजवळ काळ्या रंगाच्या बर्गमन स्कूटीवरून आलेल्या दोघांनी त्यांचा रस्ता अडविला. चाकूचा धाक दाखवत पैसे काढण्याची धमकी दिली. अन्यथा जीवे मारण्याची धमकी देत त्यांच्या खिशातील २० हजार रुपये हिसकावून आरोपी पसार झाले.

या घटनेची तक्रार मिळताच पोलिसांनी स्कूटीचे वर्णन आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविली. यावेळी फिर्यादीसोबत असलेल्या प्रफुल्ल मेश्राम याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याची कसून चौकशी करण्यात आली. पोलिसी खाक्या दाखवताच त्यानेच लुटीची माहिती आपला मित्र बाल्या ऊर्फ मिलिंद मेश्राम याला दिल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

या माहितीवरून पोलिसांनी मिलिंद मेश्राम आणि संदीप वामन गेडाम (दोघेही रा. खोलदोडा) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १० हजार ५०० रुपये रोख, गुन्ह्यात वापरलेली बर्गमन स्ट्रीट स्कूटी (क्र. एमएच ४० सीयू ७९१०) आणि तीन मोबाइल फोन असा एकूण १ लाख ३६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांच्या कारवाईतून मित्राच्या विश्वासघाताचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. प्रवासातील सोबतीच लुटीचा सूत्रधार निघाल्याने या घटनेची परिसरात चर्चा सुरू आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

ठाणेदार अजितसिंग देवरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक सचिन उरकुडे, स्वप्निल गेडाम, सहायक फौजदार किशोर ठाकूर, पोलीस हवालदार मारबते, चंद्रकांत वाघमारे, पोलीस शिपाई वासुदेव समर्थ आणि चालक पोलीस हवालदार अमोल कुथे यांनी ही कारवाई पार पाडली.

थोडक्यात

बनगाव माता मंदिरातील चोरीचा छडा; मध्य प्रदेशातून चांदीचा मुकुट व छत्र जप्त

आमगाव पोलिसांची कारवाई; ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत



दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

तालुक्यातील बनगाव येथील माता मंदिरातून दुर्गा माता व काली माता यांच्या मूर्तीवरील चांदीचे दोन मुकुट चोरीस गेल्याच्या प्रकरणाचा आमगाव पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणातील आरोपीला अटक करून त्याच्याकडून चोरीस गेलेला अंदाजे ४० हजार रुपये किमतीचा चांदीचा मुकुट व छत्र मध्य प्रदेशातील वाराशिवणी येथून जप्त करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, बनगाव येथील माता मंदिरात २१ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ९ ते २२ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजताच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या कुलपाचा कोंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर दुर्गा देवीच्या मूर्तीच्या डोक्यावरील अंदाजे २०० ग्रॅम वजनाचा २० हजार रुपये किमतीचा चांदीचा मुकुट आणि काली माता मूर्तीच्या डोक्यावरील अंदाजे २०० ग्रॅम वजनाचा २० हजार रुपये किमतीचा चांदीचा मुकुट असा एकूण ४० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. याप्रकरणी बनगाव येथील फिर्यादी प्रमोद ईश्वरदास महारवाडे (वय ४३) यांच्या तक्रारीवरून आमगाव पोलीस ठाण्यात अप क्रमांक ६७१/२०२६, कलम ३०५ भारतीय न्याय संहिता अन्वये २२ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानुसार पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदनी चानदपूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे यांच्या नेतृत्वात एपीआय जितेंद्र गुरुलुने,पोलीस हवालदार खुशालचंद बर्वे, पोलीस अमलदार राहुल बिसेन, तेजराम राऊत, चालक पोलीस हवालदार राकेश परिहार यांनी तपासाची चक्रे फिरवत या गुन्ह्यातील आरोपी बिरजू ऊर्फ रामकिसन तुकाराम कुंभरे (वय ५५, रा. मुरपार, ता. देवरी, जि. गोंदिया) याचा शोध घेतला. त्यानंतर आरोपीविरुद्ध प्रोडक्शन वॉरंट प्राप्त करून त्याला ताब्यात घेण्यात आले. व त्याला अटक करण्यात आली. पुढील तपास आमगाव पोलीस करीत आहेत.

जिचकर यांचे दिवाणी अपील फेटाळले, मनपाच्या जमिनीवरील ताब्याच्या दाव्याला यश



दै.सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनीवरील ताब्याबाबत महेंद्र जिचकर यांनी दाखल केलेले दिवाणी अपील जिल्हा न्यायाधीश-६, नागपूर यांनी खर्चासह फेटाळून लावले आहे. त्यामुळे तात्पुरता मनाई आदेश देण्याची मागणी फेटाळणारा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय कायम राहिला आहे. फुटाळा परिसरातील नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनीवर आपला हक्क व ताबा असल्याचा दावा करीत जिचकर यांनी महानगरपालिकेला संबंधित जागेचा ताबा घेण्यापासून रोखण्यासाठी न्यायालयाकडे तात्पुरत्या मनाई आदेशाची मागणी केली होती. मात्र, संबंधित विवादित जमीन ही त्यांच्या मालकीच्या ६०० चौ. मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडापेक्षा वेगळी असून, ती नागपूर महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक जमीन असल्याचे न्यायालयीन नोंदींवरून स्पष्ट झाले. तसेच, विवादित जमिनीवर आपला हक्क असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध करण्यात अपीलकर्ते अपयशी ठरल्याने त्यांना तात्पुरता मनाई आदेश देण्याचा कोणताही आधार नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. या प्रकरणात न्यायालयाने Misc. Civil Appeal No. 137/2026 फेटाळून लावत कनिष्ठ न्यायालयाने ५ मे २०२६ रोजी दिलेला आदेश कायम ठेवला आहे.

या निकालामुळे नागपूर महानगर पालिकेच्या मालकीच्या जमिनीवरील अनधिकृत ताब्याविरुद्ध महानगरपालिकेने घेतलेल्या भूमिकेला न्यायालयीन बळ मिळाले आहे. तसेच, महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनीचा ताबा पुन्हा मिळविण्याच्या प्रयत्नांना या निर्णयामुळे महत्त्वपूर्ण यश प्राप्त झाले आहे. या प्रकरणात नागपूर महानगरपालिकेतर्फे ॲड. ए. एम. काझी यांनी न्यायालयात बाजू मांडली. त्यांना विधी अधिकारी श्री. सुरज पारोचे आणि सहाय्यक विधी अधिकारी श्री. आनंद शेंडे यांचे सहकार्य केले.

ऑटो एलपीजी उद्योग वाचवण्यासाठी केंद्र सरकारने ठोस धोरणात्मक पावले उचलावीत; नितीन सोळंकेची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

देशातील सुरक्षित, स्वच्छ आणि किफायतशीर इंधन पर्याय असलेला 'ऑटो एलपीजी' उद्योग सध्या गंभीर संकटात सापडला असून तो बंद होण्याच्या मार्गावर आहे. हा उद्योग बंद पडल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेवर, रोजगारावर आणि पर्यावरणावर अत्यंत वाईट परिणाम होईल, असा इशारा ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन चे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन सोळंके यांनी दिला आहे. या संदर्भात त्यांनी केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री, मंत्रालय सचिव आणि पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस रेग्युरेटरी बोर्ड 'च्या अध्यक्षांना पत्र पाठवून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. ऑटो एलपीजी चॅनेल बंद केल्याने वाहनांची इंधनाची मागणी संपणार नाही, उलट ती अवैध मार्गाकडे वळेल. त्यामुळे केंद्र सरकारने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

घोर निष्काळजीपणामुळे आपण सर्वजण अकाली मृत्यूच्या उंबरठ्यावर

डॉ. प्रितम भि. गेडाम
नागपूर

पर्यावरण हाच संपूर्ण जीवसृष्टीचा एकमेव आधार आहे. मात्र, आज प्रत्येक भारतीय दूषित हवेत श्वास घेत आहे, तरीही आपण सुधारण्याचे नाव घेत नाही. पर्यावरणाचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी सकारात्मक पावले उचलण्याच्या आवश्यकतेविषयी जागतिक स्तरावर जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी जागतिक पर्यावरण संरक्षण दिन साजरा केला जातो. वाहनांमधून होणारे उत्सर्जन आणि वाढती गर्दी, औद्योगिक उपक्रम व औष्णिक ऊर्जा प्रकल्प, घरांमध्ये लाकूड, कोळसा यांसारख्या घन इंधनांचे ज्वलन, बांधकामे आणि रस्त्यांवरील धूळ, जैववस्तूंचे तसेच उघड्यावर कचरा जाळणे, शेतांमध्ये पराली (पीक कापणीनंतर उरलेले अवशेष) जाळणे, फटाके फोडणे, हवामानविषयक कारणांमुळे प्रदूषकांचे वातावरणात साचणे, प्रक्रिया न केलेले नगरपालिका सांडपाणी, औद्योगिक सांडपाणी, रासायनिक वस्त्रोद्योग, अनेकदा कोणतीही प्रक्रिया न करता जड धातू आणि विषारी कचरा जवळच्या जलस्रोतांमध्ये सोडणे, घातक रसायनांचा वापर केलेल्या शेतीतून वाहून येणारे प्रदूषित पाणी, घनकचरा आणि ई-कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन, रासायनिक खते व कीटकनाशकांचा अतिवापर, खाणकाम आणि औद्योगिक कचरा कुठेही फेकून देणे, तसेच अनियंत्रित बांधकामे आणि व्यावसायिक उपक्रम, अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाची पातळी अत्यंत धोकादायक वळणावर पोहोचली आहे.

पर्यावरण कामगिरी निर्देशांक २०२६ नुसार, १७७ देशांच्या यादीत भारताला २२.४६ गुणांसह १७६ वे स्थान मिळाले आहे. या स्थानावरून आपण गंभीर वास्तवाचा अंदाज घेऊ शकतो. भारत देश २०१६ मध्ये १४१ व्या स्थानावर होता. २०२२ मध्ये भारत सर्वात खराब कामगिरी करणाऱ्या पाच देशांमध्ये समाविष्ट झाला. आपला गुणांक भूतान (८२ वे), श्रीलंका (११८ वे), नेपाळ (१३४ वे), पाकिस्तान (१४८ वे) आणि बांगलादेश (१६१ वे) या शेजारी देशांच्या तुलनेतही मागे आहे. सतत वाढणारे शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यांमुळे हवेची गुणवत्ता, जैवविविधता आणि हरितगृह वायूंचे उत्सर्जन यांवर सातत्याने दबाव निर्माण होत आहे. तथापि, अक्षय ऊर्जा, कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेच्या पायाभूत सुविधांनी सकारात्मक योगदान दिले आहे. जल गुणवत्ता निर्देशांकात भारत १२२ देशांपैकी १२० व्या स्थानावर आहे. २०२६ च्या जागतिक भूक निर्देशांकात १२२ देशांपैकी भारत १०० व्या स्थानावर आहे, भारताचा गुणांक २४.१ असून, त्याचा समावेश गंभीर भूक या श्रेणीत होतो.

वायुगुणवत्ता जीवन निर्देशांकानुसार, भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक प्रदूषित देश आहे. भारतातील सुमारे १४० कोटी लोक अशा वातावरणात राहतात, जिथे हवेतील प्रदूषणाचे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या पीएम २.५ च्या पातळीपेक्षाही अधिक आहे. काही भागांमध्ये तर हे प्रमाण भारताच्या स्वतःच्या राष्ट्रीय मानकांपेक्षाही खूप जास्त आहे. जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सूक्ष्म कणांमुळे एका सामान्य भारतीय व्यक्तीचे आयुर्मान सुमारे ३.५ वर्षांनी कमी होते, तर दिल्ली-एनसीआरसारख्या ठिकाणच्या रहिवाशांच्या आयुमानांत ८.२ वर्षांपर्यंत घट होऊ शकते.

स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२५ या अहवालानुसार, २०२३ मध्ये भारतात वायुप्रदूषणामुळे २० लाखांहून अधिक मृत्यू झाले. ही संख्या २००० च्या तुलनेत ४३ टक्क्यांनी अधिक आहे. तसेच, द लॅन्सेट काउंटडाउन २०२५ नुसार, २०२२ मध्ये केवळ मानवनिर्मित सूक्ष्म कणांमुळे १७.२ लाख मृत्यू झाले. या नुकसानीचे आर्थिक मूल्य ३३९.४ अब्ज अमेरिकी डॉलर इतके निश्चित करण्यात आले आहे, जे भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ९.५ टक्के आहे. या आकडेवारीवरूनच देशात निसर्गाप्रती असलेल्या घोर निष्काळजीपणाची आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाची किती मोठी किंमत सामान्य माणसाला मोजावी लागत आहे, याचा अंदाज येऊ शकतो. प्रदूषणामुळे हृदयविकार, पक्षाघात (स्ट्रोक), फुफ्फुसांचे सतत होणारे नुकसान आणि श्वास घेण्यास होणारा गंभीर त्रास, न्यूमोनिया आणि श्वसनसंस्थेचे संसर्गजन्य आजार, कर्करोग निर्माण करणाऱ्या प्रदूषकांचा आणि औद्योगिक उत्सर्जनाचा दीर्घकाळ श्वासावाटे शरीरात प्रवेश झाल्यामुळे होणारा कर्करोग, चयापचयाशी संबंधित आजार, मूत्रपिंडांचे आजार आणि दूषित पाण्यामुळे होणारे आजार, टाइप २ मधुमेह तसेच दीर्घकालीन मूत्रपिंडविकार यांचा धोका सातत्याने वाढत आहे. हे आजार अत्यंत खर्चिक असून, माणसाला मृत्यूच्या दारेत ढकलणारे आहेत. अलीकडेच इंडिया टुडेमध्ये प्रकाशित झालेली एक बातमी वाचली. त्यामध्ये प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. संजीव बागई यांनी देशात दरवर्षी वायुप्रदूषणामुळे होणाऱ्या मृत्यूंची तुलना हिरोशिमा, नागासाकी आणि कोविड-१९ मुळे झालेल्या मृत्यूंशी केली आहे. प्रदूषणामुळे मानवी शरीराच्या प्रत्येक अवयवाचे नुकसान होत आहे. एवढेच नव्हे, तर गर्भवती महिलेच्या उदरात वाढणाऱ्या बाळालाही आजारी पाडत आहे. प्रत्येक गोष्ट ही निसर्गाची देणगी आहे. प्रत्येक व्यवसायासाठी किंवा उद्योगासाठी आवश्यक असणारा कच्चा मालदेखील पर्यावरणातूनच मिळतो. गेल्या काही दशकांमध्ये मानवाने विकासाच्या नावाखाली अनेक यांत्रिक साधनांचा शोध लावला आणि मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले. निसर्गातील अनेक संसाधन तर येणाऱ्या पिढ्यांना पाहायलाही मिळणार नाहीत. म्हणजेच, त्यांच्या वाट्याच्या संसाधनांचाही उपभोग आजच्या मानवाने घेतला आहे.

अनेकदा कोळसा आणि खनिजांच्या उत्खननासाठी किंवा औद्योगिक गरजा पूर्ण करण्यासाठी जंगलांची तोड केली जाते. महामार्ग, रेल्वेमार्ग, धरणे बांधण्यासाठी तसेच शहरीकरणासाठी जमिनीवरील नैसर्गिक आच्छादन हटवले जाते. फर्निचर, कागद, बांधकाम आणि इंधनासाठीही सातत्याने झाडांची कत्तल केली जाते. मात्र, जंगलांचा नाश केल्यामुळे वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होतात. सुपीक मातीचा ऱ्हास होतो आणि मृदेची धूप होते. परिणामी, पूर किंवा दुष्काळासारख्या परिस्थिती निर्माण होतात. कार्बन उत्सर्जन वाढते आणि शुद्ध प्राणवायूचे प्रमाण कमी होते. प्रदूषण वाढते आणि नैसर्गिक आपत्तींच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होते. याचा थेट परिणाम जीवसृष्टीतील प्रत्येक सजीवावर, पर्यावरणातील प्रत्येक घटकावर, ऋतुचक्रावर आणि हवामानावर होतो. आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते, आजार वाढतात आणि अकाली मृत्यूंमध्ये भयावह वाढ होते.

पर्यावरणातील वाढत्या प्रदूषणाची कारणे आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय सर्वांनाच माहीत आहेत. म्हणजेच, सरकारपासून ते सामान्य नागरिकांपर्यंत प्रत्येकाला याविषयी माहिती आहे. शुद्ध पाणी, स्वच्छ प्राणवायू आणि पुरेसा पोषक आहार हा प्रत्येक माणसाचा अधिकार आणि गरज आहे. पर्यावरण संरक्षणाप्रती प्रत्येकाची उत्तरदायित्वाची भावना असणे आवश्यक आहे.

- ०८२३७४१७०४१

रामटेक नगर परिषदेतर्फे लोककलाकारांचा सन्मान; दहा वर्षांनंतर कलाकारांना आर्थिक प्रोत्साहन

मंडई-जत्रांमध्ये पारंपरिक लोककलेचा वारसा जपणाऱ्या कलावंतांचा गौरव; मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार व बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक शहराची सांस्कृतिक परंपरा आणि लोककलेचा वारसा जपण्यात मंडई व जत्रांमध्ये आपली कला सादर करणाऱ्या लोककलाकारांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. आपल्या कलेच्या माध्यमातून जनतेचे मनोरंजन करण्यासोबतच पारंपरिक कला आणि संस्कृती जिवंत ठेवणाऱ्या या कलावंतांच्या कार्याची दखल घेत नगर परिषद रामटेकच्या वतीने आयोजित 'मंडई जलसा कार्यक्रम २०२६' अंतर्गत सत्कार व बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



विशेष म्हणजे, मंडई-जत्रांमध्ये आपल्या कलाविष्कारातून सांस्कृतिक परंपरा जपणाऱ्या लोककलाकारांचा अशा पद्धतीने सन्मान आणि आर्थिक प्रोत्साहन करण्याचा उपक्रम तब्बल दहा वर्षांनंतर आयोजित करण्यात आला. त्यामुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून नव्हे, तर आपल्या लोकसंस्कृतीचे संवाहक म्हणून या कलाकारांकडे पाहिले पाहिजे, या भावनेतून नगर परिषदेने हा उपक्रम राबविला. या कार्यक्रमाला राज्याचे राज्यमंत्री आशिषजी जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन, उपनगराध्यक्ष आलोक मानकर, मुख्याधिकारी पल्लवी राऊत तसेच नगर परिषदेचे सर्व नगरसेवक उपस्थित होते.

यावेळी विविध मंडई व जत्रांमध्ये आपली कला सादर करणाऱ्या लोककलाकारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना सन्मानचिन्ह व बक्षिसांच्या माध्यमातून गौरविण्यात आले. यासोबतच कलाकारांना आर्थिक प्रोत्साहन देऊन त्यांच्या कलेला आणि मेहनतीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

लोककलाकार हे आपल्या समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. शाहिरी, लोकनृत्य, पारंपरिक वाद्यकला आणि विविध लोककलांच्या माध्यमातून ते पिढ्यान्पिढ्या आपली संस्कृती जतन करीत आहेत. बदलत्या काळात या कलांना व्यासपीठ मिळणे, कलाकारांना सन्मान मिळणे आणि त्यांच्या कलेला आर्थिक पाठबळ मिळणे गरजेचे आहे. याच उद्देशाने नगर परिषद रामटेकच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

लोककलाकारांच्या कलेचा सन्मान करणे म्हणजे आपल्या समृद्ध लोकपरंपरेचा सन्मान करणे होय. दहा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार सोहळ्यामुळे कलाकारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. भविष्यातही रामटेकमधील कला, संस्कृती आणि पारंपरिक लोककलांना प्रोत्साहन देण्यासाठी नगर परिषद कटिबद्ध राहील, अशी भावना यानिमित्ताने व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या माध्यमातून लोककलाकारांच्या योगदानाला योग्य सन्मान मिळण्यासोबतच रामटेकच्या सांस्कृतिक परंपरेला नवी ऊर्जा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

नवीन टाऊन हॉलचे बांधकाम अंतिम टप्प्यात, डिसेंबरमध्ये होणार लोकार्पण



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शहराच्या ऐतिहासिक महाल परिसरात नागपूर महानगरपालिकेतर्फे उभारण्यात येत असलेल्या नवीन श्रीमंत रघुजीराजे भोसले नगर भवन (टाऊन हॉल) इमारतीचे बांधकाम अंतिम टप्यात असून, येत्या डिसेंबर मध्ये टाऊन हॉलचे लोकार्पण होणार आहे. यासंदर्भात महापौर निता ठाकरे यांनी बुधवार (ता.२५) रोजी पाहणी केली. यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, नगरसेवक सचिन नाईक, कार्यकारी अभियंता अश्विनी येलचटवार, उप अभियंता राजीव गौतम यांच्यासह मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी बांधकामाच्या सद्यस्थितीचा तसेच प्रकल्पांतर्गत करण्यात येत असलेल्या विविध कामांचा आढावा घेतला. विशेष म्हणजे, दिल्लीतील सेंट्रल विस्टा प्रकल्पाच्या धर्तीवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज व सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण अशा मनपाच्या नवीन टाऊन हॉल इमारतीसह सभागृहाची निर्मिती केली जात आहे. अशा प्रकारे तयार होणारा हा देशातील पहिला टाऊन हॉल असणार असल्याची माहिती सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर यांनी दिली. नागपूर महानगरपालिकेद्वारे महाल येथे श्रीमंत राजे रघूजीराव भोसले सभागृह (टाऊन हॉल) नवीन इमारतीचे बांधकाम अंतिम टप्यात आहे. ६८०८.१३ चौरस मीटर भूखंडामध्ये उभारण्यात आलेले नवीन टाऊन हॉल दोन तळमजले अधिक चार मजले आहेत.

विद्युत प्रवाह सोडून वाघाची शिकार; आरोपीविरुद्ध वनगुन्हा दाखल, मृत वाघाचे शवविच्छेदन व दहन

रामटेक वनपरिक्षेत्रातील मौजा गुगलडोह येथील घटना, विद्युत प्रवाहासाठी वापरलेले साहित्य व ट्रॅक्टर जप्त

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

नागपूर वनविभागांतर्गत रामटेक वनपरिक्षेत्रातील उपवनक्षेत्र रामटेक व नियतक्षेत्र घोगरा येथे खाजगी शेतजमिनीमध्ये अवैधरीत्या विद्युत प्रवाह सोडल्यामुळे वाघाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध रामटेक वनपरिक्षेत्र कार्यालयामार्फत वनगुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

प्राप्त गुप्त माहितीनुसार वनविभागाच्या पथकाने नागपूर वनविभाग उपवनसंरक्षक डॉ. विनीता व्यास यांच्या मार्गदर्शनाखाली मौजा गुगलडोह येथे जाऊन रविशंकर रामधर जिझोते (वय ४८ वर्षे, व्यवसाय - शेती) यांची चौकशी केली. चौकशीदरम्यान त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २१ नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांनी मौजा गुगलडोह येथील त्यांच्या शेतातील भूमापक क्रमांक २३१ मध्ये खुंट्या गाडून त्याभोवती जीआय तारांचे कुंपण तयार केले होते व त्यामध्ये अवैधरीत्या विद्युत प्रवाह सोडला होता.



दि.२२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ८.०० ते ८.३० वाजताच्या सुमारास शेतात जाऊन तारांच्या कुंपणाची पाहणी केली असता, त्यामध्ये एक वाघ मृतावस्थेत आढळल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर भीतीपोटी त्यांनी मृत वाघास विहिरीजवळील शेताच्या धुऱ्यावर खड्डा करून पुरल्याची कबुली दिली.

वनविभागाने मृत वाघाचे शव बाहेर काढून ताब्यात घेतले. तसेच या घटनेत वापरण्यात आलेल्या १४ खुंट्या, अंदाजे २ किलो जीआय तार, १ पावडा, टू-कोर वायर आणि वाघाला खेचण्यासाठी वापरण्यात आलेला ट्रॅक्टर जप्त करण्यात आला आहे.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्या मानक कार्यपद्धतीनुसार मृत वाघाचे शवविच्छेदन व दहनाची कार्यवाही करण्यात आली. यावेळी नागपूर वनविभाग उपवनसंरक्षक डॉ.विनीता व्यास,रामटेक सहायक वनसंरक्षक गोविंदा लुचे, मानद वन्यजीव रक्षक अविनाश लोंढे, मानद वन्यजीव रक्षक अजिंक्य भटकर, पशुवैद्यकीय अधिकारी सोनकुसरे व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे प्रतिनिधी तसेच मंदार पिंगळे, सातपुडा फाउंडेशन, नागपूर उपस्थित होते.

सदर प्रकरणी अवैध शिकारीसंदर्भात रामटेक वनपरिक्षेत्र कार्यालयामार्फत वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अवैध विद्युत पुरवठ्याबाबत महावितरणकडून रामटेक पोलीस स्टेशन येथे स्वतंत्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास डॉ. विनीता व्यास उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली रामटेक सहाय्यक वनसंरक्षक गोविंदा लुचे, रामटेक वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे तसेच रामटेक वनपरिक्षेत्रातील क्षेत्र सहाय्यक, वनरक्षक व वनमजूर करीत आहेत.